# बित्तंबातमी!

● ठाणे | गुरुवार, १८ सप्टेंबर २०२५ | वर्ष | ४२ | अंक | २१४ | पाने | ६ | मूल्य ३ रुपये ●


## थोडक्यात

### मनोज जरांगेंचा आता 'चलो दिल्ली'चा नारा!

धाराशिव : मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांना आता चलो दिल्लीचा नारा दिला आहे. देशभरातील मराठा समाजाचे दिल्लीत अधिवेशन घेणार असल्याची माहिती मनोज जरांगे पाटील यांनी दिली आहे. हैद्राबाद गॅझेट, सातारा गॅझेट अंमलबजावणीनंतर हे अधिवेशन होणार असल्याचे जरांगे म्हणाले. लवकरच अधिवेशनाची तारीख जाहीर होणार आहे. धाराशिवमध्ये हैदराबाद गॅझेट संदर्भात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते, यावेळी मनोज जरांगे पाटलांनी ही घोषणा केली.

दिल्लीला आम्ही मागण्या घेऊन जाणार नसल्याचे मनोज जरांगे पाटील म्हणाले. आमचे मराठा बांधव अनेक राज्यामध्ये विखुरले आहेत. कधीकाळी छत्रपती शिवाजी महाराज यांनी आपल्यासाठी स्वराज्य निर्माण केले. सगळे बांधव एकत्र आले पाहिजेत अशी भूमिका आहे. महाराष्ट्रातील मराठा बांधव हरियाणाला भेटणार आहोत. हरियाणाचे बांधव महाराष्ट्राला भेटणार आहेत. तर गुजरातमधील मराठे महाराष्ट्रातील मराठ्यांना कडकडून मिठ्या मारतील. राजस्थान, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, कर्नाटक, तामिळनाडू, बिहार, गोवा, दिल्ली या ठिकाणचे मराठे आपल्या महाराष्ट्रातील भावांना मिठ्या मारतील असे मनोज जरांगे पाटील म्हणाले. आम्ही खूप दिवसांनी एकमेकांना भेटणार आहोत असे जरांगे म्हणाले. आम्ही प्रत्यक्ष ऐकमेकांना भेटणार आहोत, तो आनंद सोहळा असणार आहे. तो सुवर्णदिवस असणार आहे असे मनोज जरांगे पाटील म्हणाले. आमच्या राजाने अटक पासून कटकपर्यंत अफगानिस्तानपर्यंत झेंडा फडकवला आहे, दिल्लीतही झेंडा फडकावला. कुठे कुठे आपल्या राजाचे पवित्र पाय लागले. ती भूमी पवित्र झाली, त्या भूमिला नतमस्क झाले पाहिजे.

### आता दांडकं नाही, तर कोयते काढू- हाके


हिंगोली : मराठा आरक्षणाचा काढलेला जीआर हा ओबीसींचे आरक्षण संपवणारा आहे, यापुढे आम्ही दांडकं नाही तर कोयते काढू असा इशारा लक्ष्मण हाके यांनी दिला. बंजारा समाजानेही आता वेगळं आरक्षण न मागता ओबीसींची एकजूट राखावी, कुणीही ओबीसींमध्ये फूट पडेल असं कृत्य करू नये असं आवाहन हाकेंनी केलं. हिंगोलीच्या कळमनुरी उपविभागीय कार्यालयावर ओबीसींचा एल्गार मोर्चा काढण्यात आला होता. यावेळी लक्ष्मण हाके यांनी केलेल्या वक्तव्यावरुन आता वाद होण्याची शक्यता आहे. मराठा आरक्षणाचा जीआर ओबीसींच्या आरक्षणाला धक्का लावणारा आहे. मुख्यमंत्र्यावर आमचा विश्वास आहे, ते जीआर मागे घेतील असं लक्ष्मण हाके म्हणाले. ओबीसी आरक्षणासाठी हा विद्रोह आहे. आमच्या हक्काचं ओबीसींचे आरक्षण संपवण्याचा घाट घातलाय. आता हातामध्ये दांडकं नाही तर कोयते घेऊ असा इशारा त्यांनी दिला.

# अन् अवकाशात नरेंद्र मोदी अवतरले...

## पुण्यात पंतप्रधान नरेंद्र मोदींचा वाढदिवस ड्रोन शोने साजरा

**पुणे :**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त पुण्यातील स. प. महाविद्यालयाच्या मैदानावर खास ड्रोन लाईट शो आयोजित करण्यात आला. तब्बल एक हजार ड्रोनच्या मदतीने पंतप्रधान नरेंद्र मोदींची प्रतिमा अवकाशात अवतरली आणि पुणेकर अक्षरशा भारावून गेले. केंद्रीय सहकार आणि नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या पुढाकाराने हा उपक्रम पार पडला.



ड्रोन शोमध्ये तब्बल १००० ड्रोनच्या साहाय्याने आकाशात आकर्षक आकृत्या तयार करण्यात आल्या. यामध्ये पंतप्रधान मोदींचे थ्रीडी चित्र, मोदी सरकारच्या महत्त्वाकांक्षी योजनांचे प्रतीकात्मक दर्शन आणि "विकसित भारत" या संकल्पनेचे प्रतिबिंब दाखविण्यात आले. रात्रीच्या आकाशात उजळून निघालेल्या या थक्क करणाऱ्या दृश्यांनी पुणेकर मंत्रमुग्ध झाले. या शोसोबतच दिव्यांगांसाठी सहाय्यता शिबिर आणि सांगीतिक कार्यक्रमाचेही आयोजन करण्यात आले होते. पावसामुळे पहिल्या दिवशी कार्यक्रम स्थगित करावा लागला होता, मात्र वाढदिवशी तो उत्साहात साजरा करण्यात आला.

मोहोळ यांच्या या उपक्रमाचे पुणेकरांनी स्वागत केले असून, मोदींचा वाढदिवस वेगळ्या आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून साजरा करण्याचा हा अनोखा प्रयोग ठरला.

# गर्व से कहो, यह स्वदेशी है !

## ७५ व्या वाढदिवशी पंतप्रधान मोदींचा स्वदेशीचा नारा

**धर (मध्य प्रदेश) :**

**आपला ७५ वा वाढदिवस देशवासियांसोबत साजरा करणाऱ्या पंतप्रधान नरेंद्र मोदींनी आज् स्वदेशीचा नारा देशवासियांना दिला. यापुढे प्रत्येक दुकानावर 'गर्व से कहो, यह स्वदेशी है',असे बोर्ड लागायला हवेत, हा सणउत्सवांचा काळ आहे. आपण स्वदेशीचा मंत्र सातत्याने उच्चारायला हवा. तो तुमच्या जीवनाचा भाग व्हायला हवा असे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले,**

मध्य प्रदेशातील धार येथे एका कार्यक्रमात मोदी बोलत होते.यावेळी ते म्हणाले की, "मी विनंती करतो की, तुम्ही जे काही खरेदी कराल, ते भारतात बनलेले असावे. तुम्ही जे काही खरेदी करता त्यासाठी कुण्यातरी भारतीयांचा घाम लागलेला असावा. तुम्ही जे काही खरेदी कराल,त्याला भारतीय मातीचा सुगंध असावा. मी व्यापाऱ्यांना देशासाठी मला पाठिंबा देण्याचे आवाहन करतो. मला तुमच्या मदतीची आवश्यकता आहे कारण मला २०२७ पर्यंत विकसित भारत निर्माण करायचा आहे आणि त्याकडे जाण्यारा मार्ग आत्मनिर्भर भारतातून जातो."

### आई निरोगी तर घर निरोगी

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज मध्य प्रदेशातून 'आई निरोगी तर घर निरोगी' या देशपातळीवर उपक्रमाचे उद्‌घाटन केले. या अंतर्गत देशभरात महिलांसाठी मोफत आरोग्य शिबिरांचे आयोजन केले जाणार आहे. या शिबिरांत महिलांची तपासणी आणि उपचार पूर्णपणे मोफत होतील. याचबरोबर ८ व्या राष्ट्रीय पोषण महिन्याचाही शुभारंभ करण्यात आला. हे अभियान १७ सप्टेंबर ते १६ ऑक्टोबर या कालावधीत राबवले जाईल.**

मोदी पुढे म्हणाले, आता २२ सप्टेंबर रोजी, नवरात्रीच्या पहिल्या दिवसापासून, नवे जीएसटी दर लागू होणार आहेत. तेव्हा आपण केवळ स्वदेशी उत्पादनेच खरेदी करायला हवीत. आपण एक मंत्र लक्षात ठेवायला हवा. तो प्रत्येक दुकानावर लिहिलेला असायला हवा, अशी माझी इच्छा आहे. मी राज्य सरकारला एक मोहीम सुरू करण्याचा आग्रह करेन, प्रत्येक दुकानावर एक बोर्ड असावा - "गर्वसे कहो, यह स्वदेशी है."

# माँसाहेबांच्या पुतळ्यावर रंग फेकणाऱ्या उपेंद्र पावसकरला पोलिसांकडून अटक

## ◆ पावसकर ठाकरे सेनेच्या कार्यकर्त्याचा मित्र ◆ संपत्तीच्या वादात उद्धव ठाकरे, आदित्य ठाकरे त्रास देत असल्याच्या रागातून कृत्य केले

**मुंबई :**

**शिवसैनिकांचे श्रद्धास्थान असणाऱ्या हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या पत्नी स्वर्गीय मीनाताई ठाकरे यांच्या पुतळ्याची विटंबना करणाऱ्या आरोपीला पोलिसांनी २४ तासात अटक केली आहे. उपेंद्र गुणाजी पावसकर असे आरोपीचे नाव आहे. त्याच्या चौकशीतून चक्रावणारी माहिती पुढे आली आहे. पावसकर हा ठाकरे सेनेच्या कार्यकर्त्याचा चुलत भाऊ असल्याची माहिती प्राथमिक तपासातून पुढे आली असून गुन्हा केल्याचे त्याने कबूल केल्याची सूत्रांची माहिती आहे. संपत्तीच्या वादात उद्धव ठाकरे, आदित्य ठाकरे त्रास देत असल्याच्या रागातून त्याने हे कृत्य केल्याचे कबुल केले आहे.**



दरम्यान, मीनाताई ठाकरेंच्या पुतळ्याजवळ लाल रंग टाकून विटंबना करण्याचा प्रयत्न झाल्याची घटना उघडकीस आल्यानंतर शिवसेनेकडून तीव्र संताप व्यक्त करण्यात आला होता. तर, उध्दव ठाकरे आणि राज ठाकरे या दोन्ही ठाकरे बंधूंनी घटनास्थळी भेट देत पाहणी केली होती.

मुंबईत विविध जिल्ह्यात शिवसैनिकांनी तीव्र शब्दात भावना व्यक्त केल्या. तर, राजकीय नेत्यांनीही आपली प्रतिक्रिया देत आरोपीच्या अटकेची मागणी केली होती.

### आरोपीचा धक्कादायक खुलासा

**पोलिसांनी अटक केल्यानंतर आरोपीने जबाबात धक्कादायक माहिती दिली आहे. संपत्तीच्या वादात उद्धव ठाकरे आणि आदित्य ठाकरे हस्तक्षेप करत असल्याचा आरोप आरोपीने केला आहे. दादर पोलीस ठाण्यात श्रीधर पावसकर आणि आदित्य ठाकरे यांच्याविरोधात तक्रार देण्यासाठी तो सातत्याने यायचा, अशी सूत्रांची माहिती आहे. दरम्यान, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पत्रकारांशी बोलताना संबंधित घटनेवर तीव्र संताप व्यक्त केला होता. ही घटना अतिशय निंदनीय आहे, कोणालाही सोडले जाणार नाही. यासंदर्भात मी स्वतः पोलीस आयुक्तांशी बोललो आहे, मुख्यमंत्र्यांनी देखील लक्ष घातले आहे, ही बाब गांभीर्याने घेतल्याचे एकनाथ शिंदे यांनी म्हटलं. कोणत्याही परिस्थिती त्या समाजकंटकाला सोडले जाणार नाही, असे शिंदेंनी स्पष्ट शब्दात सांगितले.**

मनसेप्रमुख राज ठाकरे यांनीही पुतळास्थळाची पाहणी करत २४ तासांत आरोपीला बेड्या ठोका असे म्हटले होते. तर, उद्धव ठाकरे यांनीही पाहणी करत पोलिसांना सूचना केल्या होत्या. तसेच, सदर प्रकार दोन प्रकारच्या व्यक्ती करु शकतात. त्यामधील पहिलं म्हणजे स्वत:च्या आई-वडिलांचं नाव घ्यायला शरम-लाज वाटणाऱ्या लावारिस लोकांनी हे कृत्य केलं असेल, असं उद्धव ठाकरेंनी म्हटलं होतं. तसेच दुसरं म्हणजे बिहारमध्ये ज्याप्रकारे पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या आईचा अपमान झाला, म्हणून बिहार बंद करण्याचा एक असफल प्रयत्न केला गेला. त्याप्रमाणेच हा सर्व प्रकार करुन महाराष्ट्र पेटवण्याचा उद्देश असू शकतो, असेही उद्धव ठाकरेंनी म्हटले होते.

# राहुल गांधी नरेंद्र मोदींविरोधातील 'हायड्रोजन बॉम्ब' आज फोडणार

**नवी दिल्ली :**

**विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी पुन्हा एकदा मोदी सरकारविरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे. "मत चोरी" आणि निवडणूक प्रक्रियेत झालेल्या गंभीर गैरव्यवहारांचा मुद्दा उचलून धरत त्यांनी उद्या गुरुवार दिनांक १८ सप्टेंबर रोजी एका विशेष पत्रकार परिषदेत मोठा खुलासा करणार असल्याचे जाहीर केले आहे. या पत्रकार परिषदेत मोदींविरोधातील "हायड्रोजन बॉम्ब" फोडणार असल्याचे विधान राहुल गांधींनी केले असून, त्यांच्या या वक्तव्यामुळे राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.**



गेल्या काही दिवसांपासून बिहारमध्ये 'वोटर अधिकार यात्रे'दरम्यान राहुल गांधी यांनी सातत्याने निवडणूक प्रक्रियेतील अनियमिततेचा मुद्दा मांडला. "जनतेचा हक्क हिरावला गेला आहे, मतदार यादीत फेरफार करण्यात आला आहे आणि यासाठी थेट सत्ताधाऱ्यांना जबाबदार धरले पाहिजे," असे ते वारंवार म्हणाले. पाटण्यातील सभेत त्यांनी पहिल्यांदा "हायड्रोजन बॉम्ब" हा शब्दप्रयोग केला आणि येत्या काही दिवसांत धक्कादायक माहिती उघड करण्याचा दावा केला होता.

राहुल गांधी यांनी आपल्या भाषणांमध्ये थेट पंतप्रधान नरेंद्र मोदींवर निशाणा साधला. "आम्ही जे काही उघड करणार आहोत त्यानंतर मोदींना जनतेसमोर तोंड दाखवता येणार नाही. हा 'हायड्रोजन बॉम्ब' केवळ सरकारच्या कामकाजावर नाही, तर त्यांच्या नैतिक भूमिकेवरही प्रश्नचिन्ह उभे करेल," असे त्यांनी म्हटले आहे.

भाजपकडून राहुल गांधींच्या वक्तव्याची हेटाळणी करण्यात आली आहे. "राहुल गांधींना गंभीरतेने घेण्याचे कारण नाही. लोकशाही प्रक्रियेवर विश्वास न ठेवता ते नेहमीच राजकीय नाटकं करतात," अशी प्रतिक्रिया भाजपच्या प्रवक्त्यांनी दिली आहे. त्यांनी काँग्रेसवर "जनतेचे लक्ष विचलित करण्याचा प्रयत्न" केल्याचा आरोप केला आहे.

**गुरुवारी होणाऱ्या पत्रकार परिषदेत नेमका कोणता खुलासा केला जाणार, कोणते दस्तऐवज किंवा पुरावे राहुल गांधी मांडणार, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे. काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये याबाबत उत्साह असून, पक्षातर्फे "हा खुलासा मोदी सरकारच्या मूळ पाया हलवणारा ठरेल," असा दावा केला जात आहे. या पत्रकार परिषदेतून राहुल गांधी नवा राजकीय अजेंडा रचतात का, आणि त्याचा आगामी निवडणुकांवर कसा परिणाम होतो, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.**


# मध्य महाराष्ट्रासह कोकणातही वादळी वाऱ्यांसह पावसाची शक्यता

**मुंबई :**

मराठवाड्यासह मध्य महाराष्ट्रात वादळी वाऱ्यांसह पावसाची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. गेल्या चार दिवसांपासून पडणाऱ्या मुसळधार पावसाने राज्यभर थैमान घातलं असून मराठवाड्यासह ठिकठिकाणी मोठे नुकसान झाले आहे. हजारो हेक्टर शेती पाण्याखाली गेली आहे. नद्यांनी धोक्याची पातळी ओलांडली असून अनेक भागात नागरिकांच्या घरात पाणी शिरलं आहे. जनजीवन विस्कळीत झाले आहे. आजही राज्यभरात पावसाला पोषक वातावरण असून बहुतांश भागात पावसाचा ' यलो अलर्ट ' देण्यात आला आहे. कोकणपट्टीसह पुणे, नगरसह मराठवाड्यात आज पावसाची दमदार हजेरी लागणार आहे.

सध्या चक्राकार वाऱ्यांचा प्रवाह विदर्भ आणि आजूबाजूच्या परिसरात सक्रिय आहे. बंगालच्या उपसागरावर ईशान्य बाजूकडून येणाऱ्या वाऱ्यांच्या प्रवाहामुळे राज्यभरात पावसाला पोषक परिस्थिती तयार झाली आहे. प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबईने दिलेल्या अंदाजानुसार आज कोकण गोवा उत्तर मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी विजांच्या कडकडाटसह वादळी पावसाची शक्यता आहे. यावेळी 30 ते 40 किमी प्रति तास वेगाने वारे वाहतील. मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. हवामान विभागाने दिलेल्या अंदाजानुसार पुढील चार दिवस महाराष्ट्रात बहुतांश ठिकाणी पावसाचा जोर कायम राहणार आहे. आज विदर्भातील काही जिल्हे वगळता संपूर्ण राज्यभर पावसाचे अलर्ट देण्यात आले आहेत. उत्तर महाराष्ट्रातून पाऊस हळूहळू कमी होणार असून शनिवारपर्यंत पावसाचा जोर ओसरेल.

## राज ठाकरेंचे 'व्यंग फटके'




आशियाई क्रिकेट सामन्यातील विजयाचा जल्लोष करताना देशातील शहीद जवानांच्या बलिदानाकडे आणि दहशतवादी हल्ल्यांच्या वेदनेकडे दुर्लक्ष होत आहे हा धागा पकडत मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी केंद्रीय गृह मंत्री अमित शाह आणि त्यांचे पुत्र व आयसीसीचे अध्यक्ष जय शाह यांच्यावर काढलेले हे व्यंगचित्र सोशल मिडीयावर व्हायर होत आहे.

# मोदींच्या ७५ व्या वाढदिवशी ७५ रुग्णवाहिकांचे लोकार्पण

**मुंबई :**

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त डॉ.श्रीकांत शिंदे फाउंडेशनच्या माध्यमातून देण्यात येणाऱ्या ७५ रुग्णवाहिकांचे लोकार्पण आज उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. या रुग्णवाहिकांच्या मदतीने राज्यातील दुर्गम तसेच अतिदुर्गम भागात वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.**

यावेळी आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर, केंद्रीय आयुष मंत्री प्रतापराव जाधव, आमदार मनिषा कायंदे, शिवसेनेच्या राष्ट्रीय प्रवक्त्या शायना एन सी, उपमुख्यमंत्री शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे प्रमुख मंगेश चिवटे, बालाजी पाटील खतगावकर हेदेखील उपस्थित होते.




दरम्यान, राज्यात ३९४ ठिकाणी 'नमो उद्यान' विकसित करणार असल्याची घोषणा नरेंद्र मोदींच्या वाढदिवशी एकनाथ शिंदे यांनी केली. राज्यातील सर्व नगरपरिषदा व नगरपंचायतींमध्ये वैशिष्ट्यपूर्ण व नविन नगरपंचायत,नगरपालिका योजनेअंतर्गत एक उद्यान विकसित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यासाठी प्रत्येकी एक कोटी रुपयांचा निधी मंजूर करतानाच या उद्यानांना 'नमो उद्यान' नाव देण्याची घोषणा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी येथे केली.

**राज्य सरकारच्या या निर्णयामुळे राज्यातील एकूण ३९४ नगरपरिषद आणि नगरपंचायतींमध्ये नमो उद्यान वर्षभरात विकसित करण्यात येतील. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त महाराष्ट्राने दिलेली ही भेट असल्याचं उपमुख्यमंत्री शिंदे यांनी म्हटलं. नव्याने विकसित झालेल्या या उद्यानांची विभागीय स्तरावर स्पर्धा आयोजित करण्यात येणार आहे. त्यामाध्यमातून प्रत्येक विभागातून ३ नगरपरिषद/नगरपंचायतींना बक्षिसे देखील देण्याचा निर्णय जाहीर करण्यात आला आहे. तर नमो उद्यानांच्या स्पर्धेत प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांकाचे पारितोषिक संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांना जाहीर करण्यात येतील. त्यामध्ये प्रथम क्रमांकासाठी पाच कोटी, द्वितीय तीन तर तृतीय क्रमांकासाठी एक कोटी रुपये अशी बक्षिसाची रक्कम अतिरिक्त विकास निधी म्हणून विजेत्या नगरपरिषदा आणि नगरपंचायतींना देण्यात येणार आहे.**

## शिवाजी शिक्षणोत्तेजक मंडळाच्यावतीने सायबर गुन्हे विषयावर व्याख्यान

मुंबई : शिवाजी शिक्षणोत्तेजक मंडळाच्या वतीने संचालक अधिराज लोकेगावकर यांच्या मार्गदर्शनाखाली सामाजिक ऋण जपण्यासाठी विभागातील सर्व नागरिकांसाठी 'अभ्युदयकट्टा' या नावाने अभियान सुरू केले आहे. याची सुरुवात पोलिस उपनिरीक्षक नितीन हेम्बाडे यांच्या व्याख्यानाने होणार आहे. सायबर सुरक्षा या विषयावर ते मार्गदर्शन करतील. वर्षभर आपल्यासाठी विविध विषयांवर बोलण्यासाठी तज्ञ अभ्यासक या व्यासपीठावर निमंत्रित करण्यात येणार आहेत. येत्या गुरुवारी १८ सप्टेंबर सायंकाळी ७ ते ९ या वेळात शिवाजी विद्यालयाच्या सभागृहात हे व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे.

### जाहीर नोटीस

मी, श्री. मुजीबुर रहमान खान राहणार-फ्लट नं. ४०१, ४था मजला, मधुर व्हीला अपार्टमेंट ऑन ब्लॉक नं. A-७ रुम नं. ३७ सी ब्लॉक रोड, उल्हासनगर-१, असे जाहीर करतो की, मिळकत वॉर्ड नं.०९ नवीन मालमत्ता क्र.०९AI०१७४८५००० ही मिळकत मी श्री. अब्दुल सलाम अमिन खान यांच्याकडून नोटरी करुन खरेदी केली आहे. नोटरी दिनांक ११/०७/२०२२ तरी ही मिळकत प्रॉपर्टी माझे नांवे करावयाची असून त्यावर कोणाचे काहीही देणे घेणे, गहाण, दान, दुप्पट कर्ज, कब्जा असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ७ दिवसाच्या आत कर विभाग अधिकारी/उल्हासनगर महानगरपालिका यांच्याकडे लेखी अर्ज करून तक्रार नोंदवावी अन्यथा ७ दिवसानंतर आलेल्या हरकतीची दखल घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

सही/-
श्री. मुजीबुर रहमान खान

### जाहीर नोटीस

मी, श्री. पंकज मधुकर कापडे राहणार-तळमजला+१ मजला रुम नं. १२ चाळ नं. १ आकाश कॉलनी उल्हासनगर-५, असे जाहीर करतो की, मिळकत वॉर्ड नं.५५ नवीन मालमत्ता क्र.५५DI०१२४५५९०० Area=८३८ चौ. फुट प्रत्येक मजला ही मिळकत मी श्री. हरेश बिहारीलाल आहुजा यांच्याकडून नोटरी करुन खरेदी केली आहे. नोटरी Reg No.G-१० Sr. No.४१९ दिनांक २६/०८/२०२५ तरी ही मिळकत प्रॉपर्टी माझे नांवे करावयाची असून त्यावर कोणाचे काहीही देणे घेणे, गहाण, दान, दुप्पट कर्ज, कब्जा असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ७ दिवसाच्या आत कर विभाग अधिकारी/ उल्हासनगर महानगरपालिका यांच्याकडे लेखी अर्ज करून तक्रार नोंदवावी अन्यथा ७ दिवसानंतर आलेल्या हरकतीची दखल घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

सही/-
श्री. पंकज मधुकर कापडे

### जाहीर नोटीस

मी, असिफा खातुन D/o अन्वर राहणार-M.I.D.C धोबी घाट, कमला नेहरु नगर उल्हासनगर-१, असे जाहीर करते की, मिळकत वॉर्ड नं.०४ नवीन मालमत्ता क्र.०४AO०१४२३१८०० Area=२५८ चौ. फुट ही मिळकत मी मोहम्मद अब्बास सुभान अंसारी यांच्याकडून नोटरी करुन खरेदी केली आहे. नोटरी Reg No.-१०८ दिनांक २५/०८/२०२५ तरी ही मिळकत प्रॉपर्टी माझे नांवे करावयाची असून त्यावर कोणाचे काहीही देणे घेणे, गहाण, दान, दुप्पट कर्ज, कब्जा असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ७ दिवसाच्या आत कर विभाग अधिकारी/उल्हासनगर महानगरपालिका यांच्याकडे लेखी अर्ज करून तक्रार नोंदवावी अन्यथा ७ दिवसानंतर आलेल्या हरकतीची दखल घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

सही/-
असिफा खातुन D/o अन्वर

### जाहीर नोटीस

मी, श्री. रविंद्र रामचंद्र थोरवे राहणार-बॅरेक नं. १४१६ मागे रुम नं. ०४, मराठा सेक्शन-३२ उल्हासनगर-४, असे जाहीर करतो की, मिळकत वॉर्ड नं.४१ नवीन मालमत्ता क्र.४१CO०१९७०७३०० Area=३०० चौ. फुट ही मिळकत मी श्रीमती लक्ष्मी विठ्ठल रोटे यांच्याकडून नोटरी करुन खरेदी केली आहे. नोटरी Reg No.G-२२ Sr No. १३८ दिनांक १५/०९/२०२५ तरी ही मिळकत प्रॉपर्टी माझे नांवे करावयाची असून त्यावर कोणाचे काहीही देणे घेणे, गहाण, दान, दुप्पट कर्ज, कब्जा असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ७ दिवसाच्या आत कर विभाग अधिकारी/उल्हासनगर महानगरपालिका यांच्याकडे लेखी अर्ज करून तक्रार नोंदवावी अन्यथा ७ दिवसानंतर आलेल्या हरकतीची दखल घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

सही/-
श्री. रविंद्र रामचंद्र थोरवे

### जाहीर नोटीस

मी, श्रीमती इंदिरा हिरानंद मोटवानी राहणार-फ्लॅट नं. ४०२, ४था मजला, साई पार्क अपार्टमेंट बी. के. नं. ९९० रुम नं. १,२,३,४ व ५ स्टेशन रोड, उल्हासनगर-३, असे जाहीर करते की, मिळकत वॉर्ड नं.३५ नवीन मालमत्ता क्र.३५BI००६४०३४०० Area=९२४ चौ. फुट ही मिळकत मी श्री. राम गोरधनदास चांदवाणी यांच्याकडून नोटरी करुन खरेदी केली आहे. नोटरी Sr No. ९ दिनांक ०९/०५/२०२५ तरी ही मिळकत प्रॉपर्टी माझे नांवे करावयाची असून त्यावर कोणाचे काहीही देणे घेणे, गहाण, दान, दुप्पट कर्ज, कब्जा असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ७ दिवसाच्या आत कर विभाग अधिकारी/ उल्हासनगर महानगरपालिका यांच्याकडे लेखी अर्ज करून तक्रार नोंदवावी अन्यथा ७ दिवसानंतर आलेल्या हरकतीची दखल घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

सही/-
श्रीमती इंदिरा हिरानंद मोटवानी

### जाहीर नोटीस

मी, श्री. मनोज सुनिल गोसावी राहणार-रुम शांतीनगर राठोड, बंगलो समोर उल्हासनगर-३, असे जाहीर करतो की, मिळकत वॉर्ड नं.२९ नवीन मालमत्ता क्र.२९CO००५१७४३०० Area=१८० चौ. फुट ही मिळकत मी श्रीमती सुभावती शिवपूजन जयस्वार यांच्याकडून नोटरी करुन खरेदी केली आहे. नोटरी Reg No.-५६७ दिनांक २६/०२/२०२४ तरी ही मिळकत प्रॉपर्टी माझे नांवे करावयाची असून त्यावर कोणाचे काहीही देणे घेणे, गहाण, दान, दुप्पट कर्ज, कब्जा असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ७ दिवसाच्या आत कर विभाग अधिकारी/उल्हासनगर महानगरपालिका यांच्याकडे लेखी अर्ज करून तक्रार नोंदवावी अन्यथा ७ दिवसानंतर आलेल्या हरकतीची दखल घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

सही/-
श्री. मनोज सुनिल गोसावी

### जाहिर नोटिस

सर्व लोकांना या नोटीसद्वारे जाहिरपणे सुचीत करण्यात येते की मौजे कुळगाव, सर्व्हे नं. ६७, हिस्सा नं.२ पैकी, ता. अबरनाथ, जि. ठाणे यावरील मानव पार्क फेज ५ को.ऑप. हाउसिंग सोसायटी मधिल सदनिका क्र . १०३, पहिला मजला, बिल्डिंग नं. ई ४ क्षेत्रफळ - ५२० चौ.मी, बांधिव, म्हणजेच ४८.३२ चौ. मी बांधिव ही सदनिका मिळकत माझे अशिल श्रीमती. सोना खोडीदास पडाया यांनी मे. महादेव कनस्ट्रक्शन यांच्या कडुन नोदणीकृत दस्त क्र. उहन-२-३१८०/२००१, दिनांक २८.०९.२००१ अन्वये खरेदी केलेली आहे.

सदरवरील वर्णन केलेली सदनिका मिळकत श्रीमती. सोना खोडीदास पडाया यांनी श्री. भुपेंद्र धर्माजी कांबळे व सौ. नेहा भुपेंद्र कांबळे ह्यांना दिनांक २१.०३.२०२५ रोजी नोदणीकृत दस्त क्र . उहन-२-४२११/२०२५ अन्वये विकलेली आहे.

या सदनिकेचे भागभाडंवल प्रमाणपत्र ( शेअर सर्टीफीकेट) क्र. ०७ व भाग भांडवल क्र . ३१ ते ३५ सोसायटीमध्ये हरविले आहे, तरी सदर भागभाडंवल प्रमाणपत्र कोणत्याही व्यक्तीस सापडल्यास अथवा आढळल्यास त्यांनी ते कृपया खालील पत्यावर पुढील ०७ दिवसात परत करावे. तसेच वरील हरविलेल्या सदर भाग प्रमाणपत्राचे कोणत्याही व्यक्तीने गैरवापर केल्यास श्रीमती. सोना खोडीदास पडाया कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाहीत व सदर मुदतीत कोणतेही लेखी हरकत व तक्रार न आल्यास श्रीमती. सोना खोडीदास पडाया हे मानव पार्क फेज ५ को.ऑप.हौसिंग सोसायटीमध्ये दुय्यम प्रत (डुप्लिकेट) शेअर सर्टीफिकेट मिळणेकामी अर्ज करतील.

दिनांक : १३.०९.२०२५

सही/-
वकील श्री. किशोर र नेमाडे
कार्यालयीन पत्ता : १०५,१०८, ई - विग, पहिला मजला, सुरज सोसायटी, वैशाली टॉकिजच्या मागे, जैन मंदिर जवळ, सर्वोदय नगर, मांजर्ली रोड, बदलापूर (प), ता. अंबरनाथ जि. ठाणे.
मो. ९७३०२२५७१८/९३२०६७४६४२

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस सदरच्या जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, आमचे अशील श्रीमती गीता माधव वैद्य, व सौ. मृदुला श्रीकांत कर्वे, रा. बदलापूर यांनी मौजे कुळगांव, तालुका अंबरनाथ, जिल्हा ठाणे, यांनी खालील परिशिष्टात नमुद निवासी सदनिका कायम स्वरूपी विकत देण्याचे ठरविले आहे. सदरच्या निवासी सदनिकेचे मालक श्री माधव हरी वैद्य हे होते. परंतु श्री माधव हरी वैद्य यांना १७/०५/२०२० रोजी देवाज्ञा झाली. त्यांच्यानंतर आमचे अशील श्रीमती गीता माधव वैद्य, व सौ. मृदुला श्रीकांत कर्वे हेच वारसा हक्काने सदरच्या निवासी सदनिकेचे मालक झाले असून त्यांनी सदरची निवासी सदनिका विकत देण्याचे ठरविले आहे .

सदरच्या निवासी सदनिकेचा तपशिल खालीलप्रमाणे

तुकडी जिल्हा ठाणे पोट तुकडी तालुका अंबरनाथ जिल्हा ठाणे येथील मौजे कुळगांव, कुळगांव बदलापूर नगरपरिषद यांचे हद्दीतील व दुय्यम निबंधक कार्यालय उल्हासनगर २ यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व्हे क्रमांक १०४४ to १०४९ या मिळकतीवरील निवासी सदनिका नं. ७, २ रा मजला, 'बी' विंग, राधेय को.ऑ.हौ.सो.ली. मधील, गोळे वाडी, येथील सदर निवासी सदनिकेच्या कराराबाबत कुणाही व्यक्तिचे अथवा संस्थेचे कोणत्याही प्रकारचे हितसंबंध, हक्क, अधिकार, मालकी, वहिवाट, गहाण, तारण, कब्जा, पोटगी अथवा इतर कोणत्याही प्रकारचे हक्क अधिकार बाधित होत असल्यास अथवा सदर व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तशा हरकती योग्य त्या कागदोपत्री पुराव्यांसह प्रस्तुतची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे आत आमचेकडे खाली नमुद पत्त्यावर सादर कराव्यात. सदर मुदतीत हरकती न आल्यास सदर व्यवहारास कोणाचीही हरकत नाही असे समजून आमचे अशील व्यवहार पूर्ण करतील. सदर मुदतीनंतर आलेल्या कुठल्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व सदर हरकतींमुळे आमचे हक्कास कोणत्याही प्रकारे बाधा येणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी .

दिनांक : १७.०९.२०२५

सही/-
वकिल-देवेंद्रनाथ श्रीकांत जोशी, ,
पत्ता : फ्लॅट क्र . ३, पहिला मजला, "अन्नपूर्णा सदन अन्नपूर्णा व्हिला को. ऑ.हौ. सो., दुर्गा हॉटेलच्या वर, गांधी चौक, कुळगांव, बदलापूर (पूर्व ) - ४२१५०३. भ्रमणध्वनी : ७३९१९१७३८९

### महत्त्वपूर्ण निवेदन

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींचा मजकूर (ॲडव्हर्टाइजिंग कॉपी) स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची (कन्टेन्ट) पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी, जाहिरातींतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तींबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान वा हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी दैनिक बित्तंबातमीला जबाबदार ठरविता येणार नाही, त्यामुळे वाचकांना आम्ही असा सा देतो को, जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्यांच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी त्यांनी आवश्यक ती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.

### जाहीर नोटीस

मी, श्री. सुनिल जनार्दन गोसावी राहणार-गायकर चाळ शांतीग्राम विद्यालय समारे शांतीनगर, उल्हासनगर-३, असे जाहीर करतो की, मिळकत वॉर्ड नं.२९ नवीन मालमत्ता क्र.२९CO०२०९५०९०० Area=१२३.५० चौ. फुट ही मिळकत मी श्री. जगदीश रघुनाथ गायकर यांच्याकडून नोटरी करुन खरेदी केली आहे. नोटरी Sr. No.-३८८ दिनांक ०९/०४/२०१८ तरी ही मिळकत प्रॉपर्टी माझे नांवे करावयाची असून त्यावर कोणाचे काहीही देणे घेणे, गहाण, दान, दुप्पट कर्ज, कब्जा असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ७ दिवसाच्या आत कर विभाग अधिकारी/उल्हासनगर महानगरपालिका यांच्याकडे लेखी अर्ज करून तक्रार नोंदवावी अन्यथा ७ दिवसानंतर आलेल्या हरकतीची दखल घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

सही/-
श्री. सुनिल जनार्दन गोसावी

### जाहीर नोटीस

मी, १. सौ जयश्री रामभाऊ तांबडे २. रामभाऊ बाबाजी तांबडे राहणार एम एच स्कूल जवळ, मिलींद नगर, उल्हासनगर-४, असे जाहीर करतो की, मिळकत वॉर्ड नं. ४३ नवीन मालमत्ता क्र. ४३CO०१९८७८६०० Area=७४९ चौ फुट ही मिळकत मी १. श्री. पंकज वसंत शिरसाठ २. अक्षरा अजय शिरसाठ यांच्याकडून नोटरी करुन खरेदी केली आहे नोटरी Reg No-०७, Sr. No.०८ दिनांक १०/०९/२०२५ तरी ही मिळकत प्रॉपर्टी माझे नांवे करावयाची असून त्यावर कोणाचे काहीही देणे घेणे, गहाण, दान, दुप्पट कर्ज, कब्जा असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ७ दिवसाच्या आत कर विभाग अधिकारी/ उल्हासनगर महानगरपालिका यांच्याकडे लेखी अर्ज करून तक्रार नोंदवावी अन्यथा ७ दिवसानंतर आलेल्या हरकतीची दखल घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

सही/-
१. सौ जयश्री रामभाऊ तांबडे
२. रामभाऊ बाबाजी तांबडे

### BEFORE THE STATE CONSUMER DISPUTES REDRESSALCOMMISSION FOR MAHARASTRA AT MUMBAI

Old Secretariats Building, Extension Building, Ground Floor, Opp. Jahangir Arts Gallery, M. G. Road, Kala Ghoda, Mumbai - 400 032.

Execution Application No. SC/27/EA/24/83
IN
Complaint No. SC/27/CC/17/529

Smt. Sajida Taqi Behlim
V/S
M/S. Crystal Homecon Pvt. Ltd. & 2 Ors.

1) Smt. Sajida Taqi Behlim
R/at : 17/15, Sun-N-Sea, Mariam Nagar, Naigaon (West), Tal:- Vasai Dist :- Thane .....Complainants

V/S

1) M/S. Crystal Homecone Pvt. Ltd.
Address at : Next to Homeopathy College,Sanath Nagar, Naringl Virar by Pass Road, Virar (East)-401301.
Mr. Vishram Shivram Sawant M/S. Crystal Homecone Pvt. Ltd.
Address at : Next to Homeopathy College, Sainath Nagar, Naringl Virar By Pass Road, Virar (east), Dist : Thane
Having Residential Address at : A-24, Park Plaza, Yari Road, Andheri (West), Mumbai-400061.
3) Mr. Krunal Vijay Shah M/S. Crystal Homecone Pvt. Ltd.
Having Address at : A/302, Narayan Nagar, CHS Ltd. Vile Parle (East)-49, Hanuman Road, Mumbai-400057.

**Public Notice**

TAKE NOTICE THAT the Applicant above named has have filed Execution Application No. 2024/83 in Complaint No.17/529, before, State Consumer Disputes Redressal Commission for Maharashtra at Mumbai

WHEREAS the Execution Application above mentioned was listed before the Commission for the hearing/submission but as it is not possible to serve the notice by regular service, to All Opponent hence the Hon'ble Commission ordered the service by substituted service i.e., Public Notice.

Notice is hereby given to Opponent that if you wish to contest the Appeal you are required to remain present on 24/09/2025 at 10.30 a.m. in person or by pleader duly instructed and produce the documents in your defense on which you desire to rely on. TAKE FURTHER NOTICE THAT in default of your appearance on the date and time above mentioned the Execution Application will be proceeded for determination in your absence and no further Notice in relation thereto shall be given

Given in my hand on this 04 Day of August 2025

Seal

Sd/-
Registrar (Legal)
State Consoner Disputes Redressal Commission Maharashtra, Mumbai

### जाहिर नोटिस

या नोटीसीव्दारे सर्वांना कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमीन मिळकतीचे मालक श्री. प्रकाश मंगळ कांबेर व ईतर यांच्याकडुन सदरहु मिळकत आमचे अशिल श्री. सतिश बैंकर यांनी विकत घेण्याचे ठरविलेले आहे. तरी सदर मिळकतीमध्ये कोणाचाही कसल्याही वा कोणत्याही प्रकारे मालकी हक्क, दावा अगर हितसंबंध असल्यास त्यांनी जाहिर नोटिस प्रसिद्ध झाल्यापासुन ०७ दिवसांचे आत आम्हांस खालील पत्यावर लेखी कळवावे व कागदोपत्री खात्री पटवावी. अन्यथा सदरील मिळकत निर्वेध व बोजेरहीत असुन इतर कोणाचा काहीही हक्क हितसंबंध नाही व असल्यास तो त्यांनी सोडुन दिला आहे असे समजले जाईल व नंतर कोणाची कसल्याही प्रकारच्या तक्रारीची दखल घेतली जाणार नाही व सदरचा व्यवहार पुर्ण केला जाईल.

| गावाचे नाव | गट नं. हिस्सा नं. | क्षेत्रफळ हे.आर. चौ. मी | आकार |
|---|---|---|---|
| मौजे उमरोली तालुका अंबरनाथ जिल्हा ठाणे | ९/८ | ०.६०.००<br>पो. ख ०.२०.००<br>एकुण क्षेत्रफळ ०.८०.००<br>यापैकी विकी क्षेत्र ४० गुंठे | १.०४ |

दिनांक : १६.०९.२०२५

सही/-
वकील श्री. किशोर र नेमाडे
कार्यालयीन पत्ता : १०५,१०८, ई - विग, पहिला मजला, सुरज सोसायटी, वैशाली टॉकिजच्या मागे, जैन मंदिर जवळ, सर्वोदय नगर, मांजर्ली रोड, बदलापूर (प), ता. अंबरनाथ जि. ठाणे.
मो. ९७३०२२५७१८/९३२०६७४६४२

### PUBLIC NOTICE
### IN THE COURT OF CIVIL JUDGE (S.D.) AT KALYAN

M.A.NO. 402 OF 2025 EXH NO.05

Shri. Naresh Sugnomal Chugh. HINDU ADULT, aged about 45 YEARS, R/O : 1st floor, Vrindavan Palace, Dev Samaj Road,Opp. Ratan Park Building,Ulhasnagar : 421004 ......PETETIONER

V/S.

NIL .......Respondent

WHEREAS the above-named petitioner has filed in this Court an application for FOR GRANT OF HEIRSHIP CERTIFICATE UNDER BOMBAY REGULATION VIII OF 1827 in respect of the properties as shown in Schedule receivable by the petitioner on the death of his mother late Smt Savita Sugnomal Chugh. The deceased left behind her aforesaid petitioner as his only legal heirs.

And whereas if any one has any interest, share & claim in respect of the property mentioned in the Schedule of Propertiy, he/she should appear in the Court either in person or through his advocate within 30 days from the date of publication of this notice and put forth his claim. If no one appears and objects to the grant of the application to the petitioner, the Court will proceed to pass necessary orders in his/her absence.

**SCHEDULE OF PROPERTIES**

Joint owner/Co. owner of
1. 1st floor, Vrindavan Palace, Dev Samaj Road, Opp. Ratan Park Building, Ulhasnagar 421004,
ABOVE RS.70,00,000/-
Net Total : 70,00,00/-

Given under my hand and seal of the court on this 15 day of September 2025

Sd/-
Clerk

Court Seal

By Order
Sd/-
Assistant Superintendent
Civil court S.D Kalyan

Process Paid

### PUBLIC NOTICE
### IN THE COURT OF JOINT CIVIL JUDGE (S.D) THANE AT THANE

CIVIL MISC. APPLICATION NO. 445/2025 EXH. NO. 06

1. MR. VISHWAS SHRIPAD WAMORKAR Age : 76 years, Occ : Business Having address at - 8/304, Shubharambh Complex Phase 1, Tikujini Wadi Road Chitalsar, Manpada, Thane (W)-400 610
2. MS. VIDYA SHRIPAD WAMORKARAge : 69 years, Occ: Household Having address at - R/at, Room No. 1, Prashant, Vishnu Nagar, Naupada, Thane (W) - 400 602
3. MRS. ANJALI BALWANT KOLHATKAR Age : 70 years, Occ : Service Having address at -Vasant Leela society, Ghodbunder Road, Thane (W)-400 615 ...APPLICANTS

V/s.

NIL ...OPPONENTS

1. Mr. Pandharinath Balwant Sant was owner of one building named Prashant standing on Plot no. 13, Bharat Coop. Housing Society Ltd., Tika no. 15, C.S. No. 53B/8, situate at Vishnu Nagar, Naupada. Mrs. Sushila Shripad Wamorkar daughter of Mr. Pandharinath Balwant Sant acquired 50% undivided share in the Said Property. Mrs. Sushila died intestate on 18/01/1999 at Thane leaving behind her children i.e. Applicants and a married daughter viz. Mrs. Asha Vijaykumar Charankar as her only legal heirs.
2. Asha, who was married but had no children, died intestate on 04/08/2022. As per Section 15(2) (a) of the Hindu Succession Act, 1956, her share in the property devolved upon her siblings - the Applicants - and not upon her husband, making them her only surviving legal heirs and successors to succeed to their estate.
3. Whereas the above named Applicants have filed Civil Misc. Application for obtaining Heirship Certificate under Bombay Regulation VIII, 1827 and Section 372 of Indian Succession Act, 1925 in the Court of Civil Judge (S.D) Thane, at Thane.
4. If anyone is having objection for grant of Heirship Certificate, same shall be raised within 30 (Thirty) days from the date of publication of this public notice, failing which it will be presumed that there is no objection for grant of Heirship Certificate to Applicants. Any objections received thereafter will not be considered.

Given under the hand & seal of the court this 15 day of 09, 2025.

Sd/-
Clerk

Court Seal

By Order
Sd/-
Assistant Superintendent
Civil Judge (S.D) Thane

### BEFORE THE STATE CONSUMER DISPUTES REDRESSALCOMMISSION FOR MAHARASTRA AT MUMBAI

Old Secretariats Building, Extension Building, Ground Floor, Opp. Jahangir Arts Gallery, M. G. Road, Kala Ghoda, Mumbai - 400 032.

Execution Application No. SC/27/EA/24/97
IN
Complaint No. SC/27/CC/17/538

Mr. Mohammed Abu Behlim
V/S
M/S. Crystal Homecon Pvt. Ltd. & 2 Ors.

1) Mr. Mohammed Abu Behlim
R/at : 17/15, Sun-N-Sea, Mariam Nagar, Naigaon (West), Tal : Vasai Dist : Thane .....Complainants

V/S

1) M/S. Crystal Homecone Pvt. Ltd.
Address at : Next to Homeopathy College,Sanath Nagar, Naringl Virar by Pass Road, Virar (East)-401301.
2) Mr. Vishram Shivram Sawant M/S. Crystal Homecone Pvt. Ltd.
Address at : Next to Homeopathy College, Sainath Nagar, By Pass Road, Virar (east), Dist :- Thane
Having Residential Address at : A-24, Park Plaza, Yari Road, Andheri (West), Mumbai-400061.
3) Mr. Krunal Vijay Shah M/S. Crystal Homecone Pvt. Ltd.
Having Address at :- A/302, Narayan Nagar, CHS Ltd. Vile Parle (East)-49, Hanuman Road, Mumbai-400057. ......Opponent

**Public Notice**

TAKE NOTICE THAT the Applicant above named has/have filed Execution Application No. 2024/97, in Complaint No.17/538, before, State Consumer Disputes Redressal Commission for Maharashtra at Mumbai

WHEREAS the Execution Application above mentioned was listed before the Commission for the hearing/submission but as it is not possible to serve the notice by regular service, to All Opponent hence the Hon'ble Commission ordered the service by substituted service i.e.. Public Notice.

Notice is hereby given to Opponent that if you wish to contest the Appeal you are required to remain present on 24/09/2025 at 10.30 a.m. in person or by pleader duly instructed and produce the documents in your defense on which you desire to rely on. TAKE FURTHER NOTICE THAT in default of your appearance on the date and time above mentioned the Execution Application will be proceeded for determination in your absence and no further Notice in relation thereto shall be given

Given in my hand on this 04 Day of August 2025

Seal

Sd/-
Registrar (Legal)
State Consoner Disputes Redressal Commission Maharashtra, Mumbai

Adv-Kavita More

### PUBLIC NOTICE
### IN THE COURT OF CIVIL JUDGE (S.D.) KALYAN AT KALYAN

Miscellaneous application no. 980/2025 Exh no. 05

Mrs. Sheetal Ravindra Pawar ....Applicant

V/s.

Mr. Mahesh Ravindra Pawar and 1 other ......Opponent

Whereas the Applicant has filed M. A no. 980/2025 for grant of Heir Ship Certificate in respect of the immovable property standing in the name of the deceased. the ownership of the said property was with deceased Late Ravindra Nathu Pawar only upto his death and the applicant and opponents are the only owner/legal heirs of the said property as per the Hindu Succession Act. The deceased late Ravindra Nathu Pawar was died on 16/06/2015 at Patan Tal-Shindkheda, Dist. Dhule.

Whereas any persons if have any objection to grant heirship certificate in favour of Applicant they should file their written objection in the Hon'ble court within 30 days from the date of publication of this notice.

Next date fixed in the matter is 10/11/2025

**SCHEDULE OF THE PROPERTY**

Flat no. 202, on the second floor, area admeasuring 48.79 Sq. Meter (525 Sq. Ft. Built-up) in the wing A of Shree Siddhi Complex after formation of the society Shree Siddhi Complex Co-op. IIsg. Soc. Ltd. situated Near Alishan Park -2, Kalyan - West, Pin code - 421 301, Dist. - Thane, Maharashtra. The said building was standing on the plot of land bearing Survey No. 16 Hissa No. 8 (Part), situated at Village Chikanghar, within the limits of Kalyan Dombivali Municipal Corporation, Dist. Thane, Maharashtra. The said property is bearing KDMC Property Tax No. B41013140600, within the limits of Kalyan Dombivali Municipal Corporation

Sd/-
Clerk

Court Seal

By Order
Sd/-
Assistant Superintendent
Civil Judge (S.D.) Kalyan

### जाहिर नोटिस

या नोटीसीव्दारे सर्वांना कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमीन मिळकतीचे मालक (१) श्री. विजयकुमार चार्लस नायडू (२) सौ. चारूशिला विजयकुमार नायडू यांच्याकडुन सदरहु मिळकत आमचे अशिल श्री. ज्ञानेश्वर घोडविंदे यांनी विकत घेण्याचे ठरविलेले आहे. तरी सदर मिळकतीमध्ये कोणाचाही कसल्याही वा कोणत्याही प्रकारे मालकी हक्क, दावा अगर हितसंबंध असल्यास त्यांनी जाहिर नोटिस प्रसिद्ध झाल्यापासुन ०७ दिवसांचे आत आम्हांस खालील पत्यावर लेखी कळवावे व कागदोपत्री खात्री पटवावी. अन्यथा सदरील मिळकत निर्वेध व बोजेरहीत असुन इतर कोणाचा काहीही हक्क हितसंबंध नाही व असल्यास तो त्यांनी सोडुन दिला आहे असे समजले जाईल व नंतर कोणाची कसल्याही प्रकारच्या तक्रारीची दखल घेतली जाणार नाही व सदरचा व्यवहार पुर्ण केला जाईल.

| गावाचे नाव | गट नं. हिस्सा नं. | क्षेत्रफळ हे.आर. चौ. मी | आकार |
|---|---|---|---|
| मौजे सोनावळे तालुका अंबरनाथ जिल्हा ठाणे | ६१/१२ | ०.३६.६०<br>पो.ख ०.०७.८०<br>एकुण क्षेत्रफळ ०.४४.४० | ४.१९ |

दिनांक : १६.०९.२०२५

सही/-
वकील श्री. किशोर र नेमाडे
कार्यालयीन पत्ता : १०५,१०८, ई - विग, पहिला मजला, सुरज सोसायटी, वैशाली टॉकिजच्या मागे, जैन मंदिर जवळ, सर्वोदय नगर, मांजर्ली रोड, बदलापूर (प), ता. अंबरनाथ जि. ठाणे.
मो. ९७३०२२५७१८/९३२०६७४६४२

नियमित वाचा
दैनिक बित्तंबामी

Judge Smt. P.D. More madam

### PUBLIC NOTICE
### IN THE COURT OF HON'BLE CIVIL JUDGE (SENIOR DIVISION) THANE AT THANE

CIVIL MISC.APPLICATION N0.784 OF 2025

Sumati Satish Rane Through POA
Shri Umeshchandra Yadav and Others ......Applicants

Versus

NIL .....Opponents

The Applicants above named have applied for grant of heirship Certificate of the deceased Shri. Satish Raghunath Rane who has expired intestate on 08th October 2024. The immovable property belonging to the said deceased are as follows :

**SCHEDULE - A**

All the piece and parcel of land bearing Plot no. W-218, in Trans Thane Creek (TTC) Industrial Estate, MIDC, admeasuring about 720 sq. meters along with factory building/structure thereon lying, being and situated at Village Koparkhairane, Navi Mumbai, Taluka and Dist. Thane and now the within the limits of Navi Mumbai Municipal Corporation.

The Applicants above named have applied for grant of Heirship Certificate of the deceased Shri. Satish Raghunath Rane in respect of the above-mentioned property. However, those who have their claims, rights, titles, interest and/or any objections for the grant of heirship Certificate in the name of the Applicants, should apply and/or lodge their respective objections, if any, within a period of 30(thirty) days from the date of publication hereof in the Court. The objections received after a period of 30 days, as mentioned hereinabove, shall not be considered and the Heirship Certificate will be Granted in the name of the Applicants as prayed for.

Given under my hand and seal of the court on this 15 day of September 2025

Sd/-
Clerk

Court Seal

By Order
Sd/-
Assistant Superintendent
Civil Court (S.D) Thane

### NOTICE

Shri / Smt. BALKRISHNA GANGADHAR RANBHOR & VIMAL BALKRISHNA RANBHOR a Member of the VISHWANATH NAGAR Co-operative Housing Society Ltd. having address at Kulgaon , BADLAPUR (EAST), TAL. AMBERNATH, DIST. THANE. and holding Flat No B-103 Wing B, 1st Floor , in the building of the society, died on , BALKRISHNA GANGADHAR RANBHOR died on 09/09/2000 &, VIMAL BALKRISHNA RANBHOR died on 08/05/2003 without making any nomination. The society hereby invites claims or objections from the heir or heirs or other claimants / objector or objectors to the transfer of the said shares and interest of the deceased member in the capital/property of the society within a period of 15 days from the publication of this notice, with copies of such documents and other proofs in support of his/her/their claims/objections for transfer of shares and interest of the deceased member in the capital/property of the society. If no claims/objections are received within the period prescribed above, the society shall be free to deal with the shares and interest of the deceased member in the capital/ property of the society in such manner as is provided under the bye-laws of the society. The claims/ objections, if any, received by the society for transfer of shares and interest of the deceased member in the capital/property of the society shall be dealt with in the manner provided under the bye-laws of the society. A copy of the registered bye-laws of the society is available for inspection by the claimants/ objectors, in the office of the society/with the Secretary of the society from the date of publication of the notice till the date of expiry of its period.

Place : Badlapur (E)
Date :16/09/2025

For and on behalf of
Sd/-
Hon. Secretary
Vishwanath Nagar Co-op. Housing Society Ltd.

Adv-For the Applicant M. M. Nirgudkar

### PUBLIC NOTICE
### THE COURT OF HONOURABLE CIVIL JUDGE ( J. D. ) AT KALYAN

Miscellaneous Application No. 123 of 2025. Exh No.05

SHRI DHEERAJ SHEENA SHETTY, Age 46 years, Occ : Business, Having PAN No. BOEPS6746C, ADHAR No. 9254 0804 6207, r/at. A/5, Ashok Apartment, Gopal Nagar - 2, Dombivli - East, Dist : Thane 421 202. ......Applicant

Take Notice that the Applicant has filed above M. A. No. 123 of 2025 in the Court of Civil Judge (J. D.) at Kalyan for grant of Succession Certificate in his to succeed and to obtain renewal of license under the provisions of The Bombay Prohibition Act, 1949 (Bom XXV of 1949) and the rules, regulations and order made there under (hereinafter called, THE LICENSE) authorizing him to sell the foreign liquors Viz ; wines, fermented liquors, spirits and mild liquors as the conditions laid down therein under Form F. L. III bearing License No. FL III 55/81-82, which license shall hereinafter referred to as, 'THE SAID LICENSE'. The License is left behind by his father Late Sheena Aitappa Shetty, who is expired on 14/11/2024 leaving behind the Applicant as his heir and representative.

**THE SCHEDULE OF DESCRIPTION OF THE SAID LICENSE**

The License under the provisions of the Bombay Prohibition Act, 1949 (Bom XXV of 1949) and the rules, regulations and orders made thereunder (hereinafter called, THE LICENSE ) authorizing him to sell the foreign liquors, Viz; wines, fermented liquors, spirits, and mild liquors as per the conditions laid down therein under Form F.L. III bearing License No. FL III 55/81-82, which license shall hereinafter referred to as, THE SAID LICENSE.

Now take Notice that anybody having objection, claim over the said License may file their objection in writing on or before expiry of 30 days from the date of publication of this Public Notice in the Honourable Court.

Objections raised after this date shall not be taken into consideration. If objections are not received in this period it shall be presumed that there is/are no objection from any third party and this Court shall be free to grant the Succession Certificate in favour of the Applicant, which please note carefully.

Signed, sealed by the undersigned,

Sd/-
Clerk

Court Seal

By Order
Sd/-
Assistant Superintendent
Civil Judge (J. D.) Kalyan

### PUBLIC NOTICE

This is to bring to the notice of General Public on behalf of my client Prakash Gajanan Sapre joint owner of Flat No. 204 admeasuring 355 sq.ft. Built-up area 2nd floor, A Wing of TRIBHUVAN Co-operative Housing Society Ltd., Dindayal Road, Opp. DNS Bank, Anand Nagar, Dombivli (West) - 421202 along with 5 shares of Rs. 50/- each bearing no. 56 to 60 under Share Certificate no. 12 herein after referred to as Said Flat and Said Shares. The said flat is bought in pursuance of the Agreement of Sale dated 25.05.2017 registered in the office of Sub-Registrar Kalyan-4, at sr. no. 5148/2017 by my client and his father late Gajanan Rajaram Sapre jointly. Gajanan Rajaram Sapre died intestate and without making nomination on 19/01/2022 and his wife Neela Gajanan Sapre predeceased to him on 23/08/1999. My client and his two siblings namely Prasad Gajanan Sapre and Aparna Umesh Paradkar are the only heirs of the deceased Gajanan Rajaram Sapre. Prasad Gajanan Sapre and Aparna Umesh Paradkar have no objection to transfer the said shares and said flat in the name of my client Prakash Gajanan Sapre.

All persons, banks, NBFCS having any claim, interest or objections to the transfer of the said shares and interest of the deceased by way of right of any nature viz ownership, sale, gift, exchange, mortgage, lien, succession, inheritance, bequest or otherwise howsoever are hereby required to make the same known in writing to the undersigned with copies of such documents and other proofs in support of his/her/their claims/objections for transfer of shares and interest of the deceased to my client within a period of 15 days from the publication of this notice hereof failing which it will be assumed that there are no claims or objections in respect of the transfer of said flat and said shares and the society shall be free to transfer the shares and interest of the deceased member in the name of Prakash Gajanan Sapre son of late Gajanan Rajaram Sapre joint owner and joint member of the society.

Place: Dombivli
Date :17/09/2025

Sd/-
Anjani Kalkar Advocate
B-3, Sahakar Sadan CHS Ltd. Sant Namdev Path, Dombivli (E) 421201.
Mob: 97695 83774/99696 17785

## थोडक्यात

### फोटो सर्कल सोसायटीच्या वतीने 'आविष्कार २०२५' राष्ट्रीय छायाचित्र स्पर्धेचे आयोजन

ठाणे : २५ वर्षांची गौरवशाली परंपरा यशस्वीपणे पूर्ण करणाऱ्या फोटो सर्कल सोसायटीच्या वतीने यावर्षी सुद्धा देशातील सर्वात लोकप्रिय व प्रतिष्ठित छायाचित्र स्पर्धा -'आविष्कार २०२५'चे आयोजन करण्यात आले आहे.

ही स्पर्धा गेली २५ वर्षे छायाचित्रण क्षेत्रातील नवोदित आणि प्रगल्भ अशा दोन्ही कलाकारांना आपली कला सादर करण्याची आणि राष्ट्रीय स्तरावर चमक दाखवण्याची संधी उपलब्ध करून देत आहे. स्पर्धेच्या माध्यमातून विविध विषयांमधून छायाचित्रकारांना आपली कल्पकता, दृष्टीकोन आणि छायाचित्रण कौशल्य सादरकरता येणार आहे. तसेच देशभरातील छायाचित्रकारांशी स्पर्धा करण्याचा अनोखा अनुभव स्पर्धकांना घेता येणार आहे. एकूण रोख पारितोषिके १,१०,००० रुपयांची आहे. स्पर्धेसाठी विषय पुढीलप्रमाणे आहेत. वन्यजीवन (Wildlife), निसर्गदृश्य व जलदृश्य (Landscape and waterscape), शहरी वास्तुकला (Urban Architecture), कृष्ण - धवल (Black and White). स्पर्धेची सुरुवात १५ ऑगस्ट २०२५ ते अंतिम दिनांक २१ सप्टेंबर २०२५ अशी आहे.केदार भट - पुणे, सुधीर नाझरे - मुरुड, मनोज मुसळे - ठाणे हे मान्यवर परीक्षक आहेत.स्पर्धा प्रवेश शुल्क हे कोणतेही १ ते २ विषय रुपये २०० आणि सर्व ४ विषयांसाठी ४०० रुपये आहेत. फोटो सर्कल सोसायटीच्या सभासदांना प्रवेश शुल्कात १० टक्के सवलत देण्यात आली आहे. नाव नोंदणीसाठी Link : https://fotocirclesociety.com/aavishkar/ या लिंक वर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### वनमंत्री गणेश नाईक यांचा आज नवी मुंबईत जनता दरबार

नवी मुंबई : वनमंत्री गणेश नाईक यांच्या अध्यक्षतेखाली आज सकाळी 10.30 वाजता वाशी येथील विष्णुदास भावे नाट्यगृह येथे "जनता दरबार" आयोजित करण्यात आला आहे. या जनता दरबारामध्ये नागरिकांनी तीन प्रतींमध्ये आपल्या समस्या विषयी लेखी निवेदने सादर करायची आहेत. सकाळी आठ वाजेपासून सहभागासाठी टोकन देण्यास सुरुवात होणार आहे. नागरिकांनी आपल्या समस्या मांडून त्या समस्यांचा निपटारा करून घ्यावा, असे मंत्री कार्यालयाकडून कळविण्यात आले आहे.

# रॅलीमध्ये अदानी समूहाची आडकाठी

**विमानतळ नामांतरासाठी ठाकरेंच्या शिवसेनेची भव्य कार रॅली**

**आंदोलनाचा निर्णय आता मातोश्रीवर !**

राज भंडारी

**पनवेल : नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला स्व. लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव द्यावे, या मागणीसाठी उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेच्या वतीने मंगळवारी पनवेलमध्ये भव्य कार रॅलीचे आयोजन करण्यात आले. शिवसेना नेते बाळ माने यांच्या नेतृत्वाखाली छत्रपती शिवाजी महाराज चौकातून सुरू झालेली ही रॅली नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या दिशेने काढण्यात आली. या रॅलीस स्थानीय भूमिपुत्र, शिवसेना पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मोठा प्रतिसाद दिला. शेकडो गाड्यांचा ताफा, घोषणा आणि भूमिपुत्रांच्या अस्मितेचा आवाज यामुळे संपूर्ण परिसरात उत्साह आणि संतप्त वातावरण दिसून येत होते.**



रॅलीने विमानतळाजवळ पोहोचताच पोलिसांनी आदेशानुसार रॅली थांबवली. त्यामुळे काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले. मात्र पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांनी संयम व सुसंवाद राखत परिस्थिती हाताळली. मोर्चेकऱ्यांमधील निवडक १० जणांना विमानतळ व्यवस्थापन कार्यालयात प्रवेश देण्यात आला. मात्र एअरपोर्ट अथॉरिटीचे प्रमुख अधिकारी शर्मा हे अनुपस्थित असल्याने शिवसैनिक संतप्त झाले आणि निवेदन न देता मागच्या पावलांनी रॅली मागे घेण्यात आली. शिवसैनिकांनी हा अपमान मानत तीव्र प्रतिक्रिया नोंदवली. "आता निर्णय मातोश्रीवर होईल, अन्यथा येत्या ३० तारखेला उद्घाटनाचा कार्यक्रम 'शिवसेना स्टाईल'ने कसा होतो ते दाखवू," असा थेट इशारा शिवसैनिकांनी दिला.

या संपूर्ण आंदोलनाची पार्श्वभूमी पाहता, नवी मुंबई विमानतळाच्या नामकरणावरून मोठा राजकीय संघर्ष पेटला आहे. विमानतळाला हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचे नाव देण्याचा प्रस्ताव तत्कालीन ग्रामविकास मंत्री एकनाथ शिंदे यांनी दिला होता. त्यावेळी स्थानिक भूमिपुत्रांनी मोठ्या प्रमाणावर आंदोलन उभारले होते. नंतर महाविकास आघाडी सरकारच्या काळात, मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी आपल्या वडिलांचे नाव मागे घेऊन दि. बा. पाटील यांचे नाव पुढे केले होते. मात्र सत्तांतरानंतर भाजप महायुती सरकारने चार वर्षांत कोणतीही ठोस कारवाई केली नाही. या पार्श्वभूमीवर शिवसेनेने भव्य रॅलीचे आयोजन जाहीर केले होते. याआधी भिवंडीचे खासदार सुरेश म्हात्रे उर्फ बाळ्यामामा यांनी आंदोलन यशस्वी केले होते, तरीही ठाकरेंच्या शिवसेनेची रॅली जाहीर वेळापत्रकानुसार पार पडली. रॅली दरम्यान छत्रपती शिवाजी महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यांना अभिवादन करण्यात आले. रॅली बस स्थानक, गार्डन हॉटेल, ठाणा नाका, कर्नाळा स्पोर्ट्स मार्गे विमानतळ रोडने पुढे सरकली.

या आंदोलनात शिवसेना उपनेते बबनदादा पाटील यांनी स्पष्ट इशारा देत सांगितले की, "सीआरझेड प्रकल्प रोखताना जशा २५० गाड्या फोडल्या होत्या, कोकण भवन फोडले होते, तशीच कृती ३० तारखेला पाहायला मिळेल," अशा शब्दांत त्यांनी आक्रमक भूमिका मांडली. शिवसैनिकांच्या घोषणांनी परिसर दणाणून गेला. "लोकनेते दि. बा. पाटील अमर राहो", "नाव आमचं – हक्क आमचा", "भूमिपुत्रांचा विजय असो", अशा घोषणा देत रॅलीतील कार्यकर्त्यांनी केंद्र सरकारविरुद्ध रोष व्यक्त केला.

# टोविंग व्हॅनवरील कर्मचाऱ्यांना पोलिसांकडून दिले बनावट चारित्र्य पडताळणी दाखले-अजय जेया

अनिल ठाणेकर

**ठाणे : टोविंग व्हॅनच्या वसुलीवरून जनआंदोलन उभारणारे अजय जेया यांनी आणखी एक महत्वाची बाब उघडकीस आणली आहे. बनावट पत्ते आणि बनावट चारित्र्य पडताळणी दाखले सादर केलेले तरूण टोविंग व्हॅनवर काम करीत आहेत. टोविंग व्हॅनवर काम करणारे हे तरूण संशयास्पद असल्याचा दावाही अजय जेया यांनी केला आहे.**



काही दिवसांपूर्वीच ठाण्यातील टोविंग व्हॅन बंद कराव्यात, या मागणीसाठी अजय जेया यांनी आंदोलन उभारले होते. आता त्यांनी पत्रकार परिषद घेऊन, ठाणे वाहतूक पोलिसांच्या टोईंग व्हॅन कामकाजात गंभीर अनियमितता झाल्याचा धक्कादायक भंडाफोड केला. अजय जेया यांनी सांगितले की, वाहतूक विभागाने निश्चित केलेल्या नियमावलीचे पालन होत नाही. माहितीच्या अधिकाराखाली मिळालेल्या कागदपत्रांनुसार, टोईंग कामगारांच्या कॅरेक्टर सर्टिफिकेट्स व पोलीस व्हेरिफिकेशन सर्टिफिकेट्समध्ये गंभीर गैरप्रकार उघडकीस आले आहेत. अनेक कामगारांनी एकच पत्ता दिलेला असून काहींनी अपूर्ण पत्ते दिल्याने त्यांची पडताळणी करणे अशक्य ठरले आहे. सलीम पठाण नावाच्या कर्मचाऱ्याचा राहण्याचा पत्ता हा सहार अपार्टमेंट, लोकमान्य नगर, फ्लॅट 503 असा दाखवला गेला आहे. मात्र, प्रत्यक्षात त्या ठिकाणी गणेश निषाद हे आणि त्यांचा परिवार रहात आहे. त्याचप्रमाणे, कोपरी परिसरात दाखवलेले पत्ते पूर्णतः बनावट असल्याचे निष्पन्न झाले असून, कसारवडवली येथे ८ जणांचा पत्ता एकच, तर मुंब्रा–कौसा येथे ७ जणांचा पत्ता एकाच ठिकाणी दाखविण्यात आले आहे.

# बोरीवली ठाणे भूयारी मार्ग

**ठाण्याकडील बाजूला धर्मवीर आनंद दिघे आणि बोरीवली कडील बाजूला विजय वैद्य यांचे नाव देण्याची मागणी**

मुंबई :



मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने बोरीवली पूर्व पश्चिम द्रुतगती महामार्गापासून ठाण्यापर्यंत भूयारी मार्ग बनविण्याचे काम हाती घेतले आहे. या भूयारी मार्गाला ठाण्याकडील बाजूला धर्मवीर आनंद दिघे यांचे तसेच बोरीवली पूर्व येथील बाजूला ज्येष्ठ राजकीय विश्लेषक आणि सामाजिक कार्यकर्ते विजय वैद्य यांचे नाव द्यावे, अशी आग्रही मागणी विजय वैद्य यांच्या प्रथम स्मृतिदिनानिमित्त आयोजित आदरांजली सभेत करण्यात आली. मागाठाणे मित्र मंडळ संचालित कै. प्रबोधनकार ठाकरे ग्रंथालय येथे मंडळाचे अध्यक्ष नंदकुमार मोरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सभेत बोरीवली ठाणे भूयारी मार्ग आणि त्या प्रकल्पात कै प्रबोधनकार ठाकरे ग्रंथालय/वाचनालयाची इमारत जात असल्याच्या बाबीचा उहापोह करण्यात आला. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने हा प्रकल्प हाती घेतला असून हे खाते उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अखत्यारीत आहे. या संबंधी एकनाथ शिंदे यांच्याकडे पत्रव्यवहार करण्यात आला असून मागाठाण्याचे आमदार प्रकाश सुर्वे यांनी स्वतः जातीने लक्ष घालून कै प्रबोधनकार ठाकरे ग्रंथालय/वाचनालय यासाठी पर्यायी जागा मिळवून द्यावी तसेच भूयारी मार्गाच्या बोरीवली पूर्व येथील बाजूला विजय वैद्य यांचे तसेच ठाण्याकडील बाजूला धर्मवीर आनंद दिघे यांचे नांव देण्याच्या मागणीचा पाठपुरावा करावा. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना मागाठाणे मित्र मंडळाने या संदर्भात पत्रव्यवहार केला आहे, पर्यायी जागा सुचविण्यात आल्या आहेत, असेही यावेळी सांगण्यात आले.

# दुबार नावांवर शिवसेना (उबाठा) पक्षाचा आवाज

**निवडणूक अधिकाऱ्यांना निवेदन सादर**

आरती परब

**दिवा : कल्याण ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील मतदार याद्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर दुबार नावे समाविष्ट झाल्याच्या तक्रारींवर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाने निवडणूक अधिकाऱ्यांना निवेदन दिले. या प्रसंगी जिल्हा संघटक तात्या माने यांच्या नेतृत्वाखाली, कल्याण ग्रामीण विधानसभा प्रमुख ॲड. रोहिदास मुंडे, दिवा शहर प्रमुख सचिन पाटील व उपशहर प्रमुख मारुती पडळकर उपस्थित होते.**




निवेदनात नमूद करण्यात आले की, दिवा शहरासह संपूर्ण कल्याण ग्रामीण विधानसभा क्षेत्रात मतदार याद्यांमध्ये अनेक मतदारांची नावे दोनवेळा किंवा त्याहून अधिक वेळा समाविष्ट झाली आहेत. त्यामुळे मतदारांमध्ये गोंधळ निर्माण होत असून निवडणुकीची पारदर्शकता धोक्यात येत असल्याचे निदर्शनास आणले. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाने स्पष्ट मागणी केली की, सर्व दुबार नावे तात्काळ वगळून मतदार यादी अचूक करण्यात यावी, जेणेकरून लोकशाही प्रक्रियेत जनतेचा विश्वास अबाधित राहील. अन्यथा मतदारांचा विश्वास कमी होऊन लोकशाही धोक्यात येईल, असा इशारा निवेदनातून देण्यात आला.

# परळ येथील हाफकिन कंपनीत ६८ वा कामगार शिक्षण दिन साजरा




मुंबई :

**परळ येथील हाफकिन बायोफार्मास्युटिकल कॉर्पोरेशन लि., या कंपनीत १६ सप्टेंबर हा ६८ वा कामगार शिक्षण दिन दत्तोपंत ठेंगडी राष्ट्रीय कामगार शिक्षण व विकास मंडळ (कामगार व रोजगार मंत्रालय, भारत सरकार), प्रादेशिक संचालनालय, मुंबई, हाफकिन बायोफार्मास्युटिकल कॉर्पोरेशन लि. आणि त्यांच्या कर्मचारी संघटनेच्या सहकार्याने साजरा करण्यात आला, अशी माहिती कामगार नेते मारुती विश्वासराव यांनी दिली.**

कार्यक्रमाचे उद्घाटन हाफकिन कार्पोरेशनचे व्यवस्थापकीय संचालक सुनील महिंद्रकर, (आयएएस ) यांच्य हस्ते झाले. आपल्या भाषणात त्यांनी मंडळ देशभरातील ५० प्रादेशिक संचालनालयांतून कामगार शिक्षण दिन साजरा करत असल्याचे सांगितले. तसेच हाफकिन कॉर्पोरेशनच्या कर्मचाऱ्यांच्या सबलीकरणासाठी कामगार शिक्षणाची भूमिका फार महत्त्वाची आहे. केंद्रीय कामगार शिक्षण मंडळाचे शिक्षण अधिकारी चंद्रसेन जगताप यांनी विविध उपक्रमांची माहिती देताना नेशन फर्स्ट या दृष्टिकोनातून मंडळ कार्यरत असून स्व-विकास, समाजविकास व संस्था-विकास या क्षेत्रांत मंडळाचे कार्य महत्त्वाचे आहे. कामगार शिक्षण योजनेमुळे संघटित व असंघटित क्षेत्रातील कामगारांना मोठ्या प्रमाणावर लाभ झाल्याचेही त्यांनी सांगितले. हाफकिन संस्थेचे प्रमुख कामगार व मनुष्यबळ विकास अधिकारी डॉ . अमित डोंगरे यांनी कामगार शिक्षण योजनेचे कौतुक केले. नेतृत्व विकास व संघटनात्मक कार्यप्रणाली मजबूत करण्यात या योजनेचे योगदान फार मौल्यवान आहे. तसेच या माध्यमातून व्यवस्थापनाला कामगार कल्याणकारी योजना अधिक प्रभावीपणे राबविण्यात मदत होत आहे. हाफकिन कर्मचारी संघटनेचे सरचिटणीस दीपक पेडणेकर आणि नितीन तिरलोटकर यांनी आपले अनुभव व्यक्त करताना सांगितले की, कामगार शिक्षणामुळे कार्यक्षेत्रात तसेच कर्मचारी-व्यवस्थापन नातेसंबंधांत सकारात्मक बदल घडून येत आहेत. या कार्यक्रमात कामगार शिक्षक, स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी आणि हाफकिन संस्थेचे कर्मचारी उत्स्फूर्तपणे सहभागी होऊन त्यांनी आपले अनुभव व्यक्त केले. याप्रसंगी कामगार शिक्षण योजनेतील योगदानाबद्दल रमेश भुजबळराव यांना विशेष सन्मानित करण्यात आले.

# टीजेएसबी सहकारी बँकेला सर्वोत्कृष्ट बँकेचा द्वितीय पुरस्कार

**महाराष्ट्र अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक्स फेडरेशनचा सन्मान**

ठाणे :

**देशातील अग्रणी नागरी सहकारी बँकांपैकी एक असलेल्या टीजेएसबी सहकारी बँकेला महाराष्ट्र अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक्स फेडरेशनकडून सर्वोत्कृष्ट बँकेचा द्वितीय पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. पाच हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक ठेवी असलेल्या बँकांच्या श्रेणीत टीजेएसबीला हा सन्मान मिळाला असून, बँकेच्या कार्यपद्धतीवर आणि तंत्रस्नेही सेवा व्यवस्थेवर पसंतीची मोहर उमटली आहे.**

**पाच हजार कोटींपेक्षा अधिक ठेवी असलेल्या बँकांच्या श्रेणीत गौरव**




हा पुरस्कार नाशिक येथे झालेल्या जाहीर कार्यक्रमात प्रदान करण्यात आला. यावेळी बँकेचे उपाध्यक्ष सीए वैभव सिंघवी, व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी निखिल आरेकर, तसेच सरव्यवस्थापक विनायक गोरे यांनी हा सन्मान स्वीकारला. राष्ट्रीय सहकार संघटनेचे सदस्य ज्योतिन्द्रभाई मेहता, आमदार प्रवीण दरेकर, फेडरेशनचे अध्यक्ष अजय ब्रम्हेचा, तसेच उपाध्यक्ष वैशाली आवाडे यांच्या हस्ते पुरस्कार देण्यात आला. टीजेएसबी बँकेची ग्राहक-केंद्रित तंत्रज्ञानयुक्त एकात्मिक कार्यप्रणाली, डिजिटल व्यवहारात अग्रक्रम आणि पारदर्शक सेवा या घटकांनी बँकेला सहकारी बँकिंग क्षेत्रात विशेष स्थान प्राप्त करून दिले आहे. या यशामुळे सहकारी क्षेत्रातील इतर बँकांसाठीही एक सकारात्मक प्रेरणा निर्माण झाली आहे. पुरस्कार वितरण समारंभाला राज्यातील विविध नागरी सहकारी बँकांचे प्रतिनिधी, सहकार क्षेत्रातील मान्यवर, आणि फेडरेशनचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कलमशेतची आयेशा वीणा जानू नात्के मॉडेलिंग शो स्पर्धेत ठरली मानकरी

अशोक गायकवाड




रायगड : रायगड जिल्ह्याच्या तळा तालुक्यातील कळमशेत येथील रहिवाशी आयु वीणा जानू भागूराम नात्के यांची मुलगी आयेशा हिने इंदौर येथे झालेल्या मॉडेलिंग शो स्पर्धे मध्ये अर्थात आयकॉन प्रेझेंट स्टारफेस फेस ऑफ इंडिया या स्पर्धेत मिस टीन स्टार फेस ऑफ इंडिया २०२५ हा किताब हाशील करून विजेतेपद मिळवले आहे. सदर मॉडेलिंग शो प्रखर शर्मा आयोजित असून सदर मॉडेलिंग शो चे मार्गदर्शक जगदीश प्रोहित आहेत. सदर एजन्सीचे नाव मॉडेलिंग आयकॉन शो असे आहे. कुमारी आयेशा ही विद्यार्थीनी बारावी ला उत्तम गुणांनी उत्तीर्ण होऊन ती तेरावी चे शिक्षण घेत असून ती सध्या विरार येथे राहते. कुमारी आयेशा हिने याआधीही विविध स्पर्धांमध्ये आपले कौशल्य सिद्ध केले आहे. उदाहरणार्थ महाराष्ट्र उत्कल क्वीन स्पर्धेत रनर-अप, फेस ऑफ महाराष्ट्र स्पर्धेत विजेतेपद डिव्हाइन आयकॉन मिस इंडिया सुपर मॉडेल बेस्ट ॲप्टिट्यूड फिमेल मध्ये हा किताब पटकावला आहे. कुमारी आयेशा हिने मिळवलेल्या यशाबद्दल कुमारी आयेशा आणि तिच्या आई वडिलांचे कलमशेत येथिल सामाजिक कार्यकर्ते काशिनाथ लक्ष्मण नात्के तालुका तळा यांनी अभिनंदन आणि तिच्या भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. कुमारी आयेशा हिच्या यशामुळे तिच्या कलमशेत गावासह संपूर्ण तळा तालुक्यात आणि तिच्या कुटुंबियात, मित्र परिवारात आणि नातेवाईकात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. कुमारी आयेशा आणि तिच्या माता पिता यांच्या वर सोशल मीडियावरून आणि प्रत्यक्ष भेटून शुभेच्छांचा वर्षाव सुरू आहे.

# बेपत्ता मुलामुलींच्या आईवडिलांसोबत संवेदनाहीन वर्तन केल्यास कारवाईचे पोलिस आयुक्तांचे आदेश

अनिल ठाणेकर

**ठाणे : हरवलेल्या / बेपत्ता लहान मुलामुलींच्या तपासाच्या प्रगतीबाबत वेळोवेळी त्यांचे आईवडील अथवा नातेवाईकांना विश्वासात घेवून अवगत करावं. त्यांना दिलासा मिळेल अशा प्रकारचा आश्वासक संवाद अथवा समन्वय ठेवावा. जेणेकरुन त्यांच्या दैनंदिन जीवनामध्ये झालेल्या घटनेमुळे झालेला मनस्ताप व अस्वस्थता कमी करण्यास मदत होईल. तसंच सदरचं संभाषण संवेदनशील व पारदर्शी असावं, अशा स्पष्ट सूचना वजा आदेश ठाणे पोलिस आयुक्त आशुतोष डुंबरे यांनी आयुक्तालय क्षेत्रातील सर्व पोलिस कर्मचारी अधिकाऱ्यांना दिले आहेत.**



सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार, बेपत्ता व्यक्तिंच्या तपासाबाबत राज्याच्या पोलिस महासंचालकांनी जारी केलेल्या मार्गदर्शक निर्देशांची गांभिर्याने दखल घेवून त्यानुसार कार्यवाही न केल्यास कारवाईची तंबीही पोलिस आयुक्तांनी दिली आहे. सदरबाबत नव्याने आदेश जारी व्हावेत, ही कायद्याने वागा लोकचळवळ आणि कल्याण विकासिनीची मागणी होती. निवड कायद्याने वागा लोकचळवळ आणि कल्याण विकासिनीने ९ सटेंबरला ईमेलद्वारे पोलिस आयुक्तांना निवेदन पाठवलेले होते व त्यात १६ सप्टेंबर रोजी आयुक्त कार्यालयासमोर धरणं आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आलेला होता. या आंदोलनात श्रमिक जनता संघाचे सरचिटणीस जगदीश खैरालिया, जन आंदोलनांचा राष्ट्रीय समन्वयाचे ठाणे शहर समन्वयक, अजय भोसले, भारतीय महिला संघटनेच्या निर्मला पवार, समता विचार प्रसारक संस्था, राज्य सरकारी कर्मचारी संघटनेचे भास्कर गव्हाळे तसंच बहुजन विकास संघाचे प्रवक्ते नरेश भगवाने यांचाही सहभाग होता. या संदर्भाने महात्मा फुले पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक बलरामसिग परदेशी, सहाय्यक पोलिस आयुक्त कल्याणजी घेटे, परिमंडळ -३ चे उपायुक्त अतुल झेंडे, परिमंडळ ४ चे उपायुक्त मा.सचिन गोरे, अपर पोलिस आयुक्त संजय जाधव यांच्याशी कायद्याने वागा लोकचळवळीचे प्रणेते राज असरोंडकर आणि कल्याण विकासिनीचे अध्यक्ष ॲड. उदय रसाळ यांची गेले आठवडाभर सातत्याने सकारात्मक चर्चा झालेली होती. बेपत्ता व्यक्तिंच्या शोधतपासाबाबत सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांचं पालन होत नाही, ही आंदोलकांची मुख्य तक्रार होती. त्या अनुषंगाने पोलिस आयुक्तांनी नव्याने आदेश जारी करावेत, अशी आंदोलकांची मागणी होती. कालपर्यंत त्याची पूर्तता न झाल्याने आंदोलन करण्यावर राज असरोंडकर, ॲड. उदय रसाळ तसंच इतर संघटना ठाम होते. काल संध्याकाळी उशीरा अपर पोलिस आयुक्त संजय जाधव यांच्याशी झालेल्या चर्चेनंतर सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांचं पालन करण्यासंदर्भात एक ताजं परिपत्रक नव्याने त्वरीत जारी करण्यात आलं.

## संपादकीय

# कोट्यवधींच्या जागेचा मुद्दा

सरकारने आमचे गांधीभवन कार्यालय परत दिले नाही अशी ओरड काँग्रेसचे महाराष्ट्रातील प्रवक्ते सचीन सावंत यांनी केली आहे. त्यांनी रिझर्व बँकेलाही त्या वादात ओढले आहे. राज्य सरकारने रिझर्व्ह बँकेची फसवणूक केली आता तो जमीन विक्रीचा करार रद्द करा अशाही मागण्या सावंतांनी केल्या आहेत. अशा मागण्या करणे हीच काँग्रेसच्या अकलेची दिवाळखोरी ठरते. मंत्रालया समोरच्या फ्री प्रेस मार्गावर स्टेट बँकेच्या समोरच्या बाजूला दोन मोठी झाडे असायची. त्या खाली पत्राच्या शेडमध्ये काँग्रेसचे मोठे कार्यालय गांधी भवन दिसत असे. खरेतर जागा सरकारचीच होती. सरकारने काँग्रेससह अन्य काही राजकीय पक्षांना तिथे कार्यालयांसाठी जागा दिलेली होती. पण काँग्रेस हा राज्यात अनेक दशके सत्तारूढ पक्ष राहिल्याने त्यांच्या कार्यालयाची एक निराळीच शान होती. पण फक्त काँग्रेसची ती जागा नव्हती तिथे राज्य सरकारच्या अर्थखात्याची महत्वाची कार्यालये होती. माहिती जनसंपर्क महासंचालकांच्या लोकराज्य मासिकासह पुस्तके व प्राशने विभागाची जागा होती. शिवसेनेचे शिवालय हे मोठे कार्यालय तिथे होते. युवा नेते आदित्य ठाकरे हे तिथे अधुनमधुन दिसायचे. शेतकरी कामगार पक्ष तिथे होता. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या स्थापने नंतर तिथे कार्यालयासाठी एक जागा मिळाली होती आणि जेंव्हा तत्कालीनही उपमुख्यमंत्री व अर्थमंत्री असलेले अजितदादा पवार यांच्याकडे राष्ट्रवादी काँग्रेसची सूत्रे 2009 मध्ये आली तेंव्हा त्यांनी त्या राष्ट्रवादी भवन नावाच्या कार्यालयाचे रूपडे पालटून टाकले. त्यांनी मोठे सबागृह, चांगले कँटीन, एसी कार्यालये अशी व्यवस्था केली. तोवर तिथे राष्ट्रवादीचे कार्यालय आहे हे फारसे लक्षात यायचे नाही. पण दादांनी तिथे सर्व मंत्री सप्ताहातील ठराविक दिवशी येतील, बसतील हा दंडक सुरु केला आणि ते स्वतः प्रत्येक मंगळवारी तिथे जनतेला भेटत असत. सकाळी साडे सातच्या ठोक्याला दादांची गाडी राष्ट्रवादी भवनाच्या गेटमधून आत शिरणार हे ठरलेले असायचे. त्या आधी कार्यालयाची व्यवस्था पाहणारा राजेश असेल वा सरचिटणीस गुरुनाथ कुलकर्णी वा मदन बाफना असतील, यांच्यासह तमाम कर्मचारी व कार्यकर्ते हजर असायचे. त्याही पेक्षा गंतम म्हणजे दादांना भेटायला, त्यांच्या पुढे गाऱ्हाणे मांडायला राज्याच्या काना-कोपऱ्यातून जनता जमलेली असायची. गांधी भवन आणि राष्ट्रवादी भवन यांच्या मध्ये समजावादी पार्टी, वंचित बहुजन आघाडी म्हणजेच भारीप बुहजन महासंघ रिपब्लीकन पक्ष, खोब्रागडे, कवाडे गट असे आरपीआय गट अशांचीही कार्यालये होती. या साऱ्या बराकींना विधानभवन बराक, असे म्हणत. ती सारी विशाल अशी चार सव्वा चार एकरांची जागा, दहा अकरा वर्षांपूर्वी मुंबई मेट्रोच्या कामासाठी सरकारने काढून घेतली व आधी एमएमआरडीएकडे व नंतर मेट्रो रेल कॉर्पोरेशनकडे सोपवली. कुलाबा ते सीप्झ या पूर्ण भुयारी मार्गाच्या कामासाठी ती जागा अत्यावश्यक होती. मंत्रालयाचे व विधानभवनाचे मेट्रो स्थानक तिथे आता झाले आहे. तो पूर्ण परिसर उकरून तिथे जमिनी खाली, टनेल बोअरिंग मशीन उतरवली गेली होती. अशी अनेक मशीन तेंव्हा मुंबईच्या विविध भागात मेट्रोची भुयारे जमिनी खाली वीस, पंचवीस मीटर खोलीवर, उकरत होती. पण जमिनीच्या पृष्ठभागावरील कामांसाठी, बांधकाम साहित्य ठेवण्यासाठी जागा लागत होत्या. मुंबईकरांचा प्रवास सुखाचा करणाऱ्या कुलाबा सीप्झ मेट्रो-तीन या मार्गचे उद्‌घाटनक आता लौकरच होईल. पण या सर्व अवाढव्य खर्चाची पूर्तात करण्यासाठी मेट्रो रेल कार्पोरेशनला काही भुखंडांची विक्री व विकास करण्याच्या परवानग्या राज्य शासाने पूर्वीच दिलेल्या होत्या. २०१५ मध्ये जेंव्हा काँग्रेसला गांधी भवन, राष्ट्रवादी काँग्रेसला राष्ट्रवादी भवन तसेच शिवसेनेला शिवालय सोडावे लागले तेंव्हा त्यांना राज्य सरकारने उत्तम पर्यायी जागा दिल्या. मोठ्या जागा मिळाल्याने पक्षही खुषीत तिथून गेले. मेट्रोचे काम पूर्ण झाल्या नंतर त्याच विधान भवन बरॅक्सच्या जागी नवीन मोठी इमारत उभी करून तिथे पक्षांची कार्यालये पुन्हा आणली जातील, असे आश्वासन राज्य सरकारने दिले होते. पण या पक्षांची कोणतीही आबाळ झालेली नाही. बेलॉर्ड इस्टेटमध्ये एक भली मोठी चार मजली जुनी इमारत राज्य सरकारकडे होती. तिथे विविध राजकीय पक्षांना मोठ्या जागा सरकारने दिलेल्या आहेत. कवाडे गट, भारीप बुहजन महासंघ, राष्ट्रवादी काँग्रेस, शेतकरी कामगार पक्ष आदिंनी बेलॉर्ड पियरच्या जागा घेतल्या. काँग्रेसला सरकारने रीगल सिनेमा भागातील मॅजेस्टिक आमदार निवासाच्या गल्लीत, टन्ना हाऊस या मोठ्या इमारतीत कार्यालयासाठी मोठी दिली आहे. सचीन सावंतांच्या अनेक पत्रकार परिषदा तिथे, टन्ना हाऊसमधील गांधी भवनात, झालेल्या आहेत. म्हणजेच राज्य सरकारने राजकीय पक्षांना काही वाऱ्यावर नाही सोडले. पण हेही खरेच आहे की दहा वर्षांपूर्वी सुरु झालेली मेट्रो-तीनची कामाची प्रगती मध्यंतरी आलेल्या, काँग्रेस राष्ट्रवादी व शिवसेना यांच्या महा विकास आघाडीच्या सरकारच्या काळात थबकली होती. कारण मेट्रो तीन भुयारी मार्गासाठी अत्यावश्यक अशी कारशेडची जागा ठाकरेंनी लटकवून ठेवली होती. जंगलांचा नाश होतोय अशी हाकाटी मारणाऱ्या काही लोकांच्या आग्रहाला बळी पडून आदित्य ठाकरेंनी, मुळात जंगलही नसलेल्या, आरे कॉलनीतील मेट्रो कार शेड तिथून रद्द करण्याचा घाट घातला होता. ती कारशेड कांजूरमार्गला हलवण्याचा खटाटोप ठाकरे सरकारने केला. पण ते प्रकल्पाच्या आर्थिक गणितात बसले नाही. ठाकरेंना पायउतार करून शिंदेंचे सरकार २०२२ मध्ये आले तेंव्हा व नंतरच्या फडणवीस सरकारने आरेतच कारशेडचे काम पूर्ण केले. त्यानंतर सीप्झ ते बीकेसी पर्यंतचा मेट्रो मार्ग आता वापरातही लेला आहे. कुलाबा ते वरळी बीकेसी हा टप्पा तयार झालेला आहे. णि ता कुलाबा ते सीप्झ हा संपूर्ण ३३ किलोमीटर लांबीचा भुयारी मेट्रो मार्ग तयार झाला आहे. कारशेड बदलण्याच्या भानगडींमध्ये मेट्रो प्रकल्पाची किंमत पाच हजार कोटींनी वाढली आहे. या मोठ्या खर्चिक प्रकल्पाची पूर्तता होण्यासाठी राज्य शसानाने मेट्रोच्या वापरासाठी मेट्रो कॉर्पोरेशनला दिलेल्या भूखंडांची विक्री करण्याची परवानगी दिलेली होती. त्यानुसार मंत्रालया समोर असणार्या नरिमन पॉइंटच्या मोक्याच्या तसेच विशाल चार एकरांच्या व्यापारी वापराच्या भूखंडाची रीतसर विक्री झाली. रीतसर टेंडर प्रक्रिया राबवून विक्री झाली. रिझर्व बँकेने हा भूखंड खरेदी केला. त्यासाठी तीन हजार चारशे कोटींची रक्कम मेट्रोला मिळाली. हा विक्री व्यवहार रीतसर नोंद झाला आहे. आता सावंत म्हणतात की राज्य सरकारने पक्षांना विश्वासात न घेताच भूखंड विकला. या तक्रारीत तथ्य एव्हढ्याचसाठी नाही की तुम्हाला त्या ठिकाणी फक्त वापरसाठी जागा दिलेली होती. सार्वजनिक हिताच्या मेट्रो प्रकल्पासाठी तुम्हाला ती जागा सोडावी लागल्या नंतर राज्य सरकारने तुम्हाला योग्य अशी जागा जवळच्याच परिसरात दिली आहे. अशा स्थितीत सावंतांनी कोर्टात जाण्याचे इशारे देऊनही फारसा उपयोग होणार नाही. मुंबईकरांच्या भल्यासाठी होत असणाऱ्या मेट्रो प्रकल्पाच्या कामाला या भूखंडाचा मोलाचा हातभार लागणार आहे. देशाच्या आर्थिक राजधनातील प्रमुख व्यापारी केंद्रात, देशाच्या मध्यवरी बँकेला, रिझर्व बँकेला, सुमारे सोळा लाख चौरस फुटांची जागा या भूखंडावर होणाऱ्या इमारत समुहामधून उपलब्ध होणार आहे. तो सारा व्यवहार रद्द करून टाका, ही काँग्रेसची मागणी, मेट्रोच्या कारशेडची जागा रद्द करून टाकण्याच्या मविआच्या निर्णयासी सुसंगत जरी असली, तरी मुंबईकरांच्या हिताशी मात्र फारकत घेणारीच आहे.

# ‘ऑनलाईन गेमिंग’वर अखेर अंकुश



> भारतात ऑनलाईन जुगाराच्या नादी लागून कोट्यवधी कुटुंबे दर वर्षी वीस हजार कोटी रुपये गमावतात. ‘ऑनलाईन गेमिंग’मध्ये हरल्याने काहीजण सर्वस्व गमावतात. कुटुंबे उद्ध्वस्त होतात. सरकारने त्यावर बंदी घालणारे विधेयक मंजूर केले, हे चांगले झाले. अर्थात या खेळांचे बहुविध रुप पाहता या विधेयकामुळे काही कौशल्यांकडे आणि व्यापारी तरतुदींकडे दुर्लक्ष होत असल्याच्या तक्रारी आहेत. या निमित्ताने घेतलेला वेध.

### पैलू



**शिवाजा कराळे**

केंद्र सरकारने संसदेत ‘ऑनलाइन गेमिंगचा प्रचार आणि नियमन विधेयक’ मंजूर केले. राष्ट्रपतींची सही झाल्यानंतर ते कायद्यात रुपांतरित होईल. या विधेयकानुसार ‘ई-स्पोर्टस’ आणि ‘सोशल गेम्स’ना प्रोत्साहन दिले जाईल, तर ‘ऑनलाइन मनी गेम्स’वर पूर्णपणे बंदी घातली जाईल. गेम्सची मदत घेऊन कोणतीही व्यक्ती ऑनलाइन बेटिंग करू शकणार नाही. सरकारचा विश्वास आहे की असे ऑनलाइन गेम केवळ व्यक्ती आणि कुटुंबांनाच नुकसान पोहोचवत नाहीत, तर ‘मनी लॉंड्रिंग’, करचोरी आणि दहशतवादाच्या निधीशीदेखील जोडले जातात. बरेच लोक फक्त मनोरंजनासाठी ऑनलाइन जुगार खेळण्यास सुरुवात करतात; परंतु नंतर त्यांना त्याचे व्यसन लागते. सरकारने ऑनलाइन गेमिंगचे तीन प्रकार केले आहेत. पहिली श्रेणी ‘ई-स्पोर्टस’, दुसरी श्रेणी ‘ऑनलाइन सोशल गेम्स’ आणि तिसरी श्रेणी ‘ऑनलाइन मनी गेम्स’. ‘ऑनलाइन सोशल गेम्स’च्या मदतीने मुले काही तरी शिकतात. या गेममध्ये काही सबस्क्रिप्शन द्यावे लागू शकते; परंतु त्या बदल्यात पैसे जिंकण्याची अपेक्षा नसते. ‘पब्ज’ हा दक्षिण कोरियाची व्हिडीओ गेम कंपनी ‘ब्लूहोल’ने तयार केले आहे. ‘पब्ज’ मध्ये अनेक खेळाडू एकत्रितपणे व्हर्च्युअल नकाशावर उतरतात आणि शेवटपर्यंत टिकतो तो विजेता बनतो. ‘फ्री फायर’देखील ‘पब्ज’ सारखाच आहे. यात जलद आणि लहान सामने असतात. ‘जीटीए’ हा एक ॲक्शन-ॲडव्हेंचर गेम आहे. यामध्ये खेळाडू शहरात फिरून मिशन पूर्ण करू शकतात. वेगवेगळी वाहने चालवू शकतात. या गेममध्ये थेट पैसा धोक्यात नाही. येथे एखादी व्यक्ती व्हर्च्युअल पद्धतीने बंदुका, कपडे किंवा इतर वस्तू खरेदी करू शकते; परंतु येथे पैसे गुंतवून पैसे जिंकण्यात काही अर्थ नाही.

ताज्या विधेयकाच्या कलम 2 (जी) नुसार खेळाडू फी, पैसे किंवा हिस्सा लावून त्या बदल्यात पैसे किंवा इतर बक्षिस जिंकत असल्यास बंदी घातली जाईल. कायदा झाल्यानंतर लोक फँटसी स्पोर्ट्स गेम, ऑनलाइन रमी, कार्ड गेम, पोकर प्लॅटफॉर्म आणि ऑनलाइन टीम तयार करून थेट पैसे गुंतवले जाणारे गेम खेळू शकणार नाहीत. ‘ऑनलाइन मनी गेम’मध्ये दोन घटक आहेत. एक म्हणजे चान्सचा खेळ (जुगार) आणि दुसरा म्हणजे कौशल्याचा खेळ. ‘ऑनलाइन मनी गेम’शी संबंधित कंपन्या ‘कौशल्याचा खेळ’ असा युक्तिवाद करुन निर्बंधांपासून सुटतात. सरकारने आणलेल्या विधेयकात चान्सचा खेळ (जुगार) आणि कौशल्याचा खेळ परिभाषित केलेले नाही.’ विधेयकानुसार, केंद्र सरकार ऑनलाइन गेमिंग प्राधिकरणदेखील तयार करेल. त्याचे काम कोणता गेम पैशाचा खेळ आहे आणि कोणता ‘ई-स्पोर्टस’ आहे हे ठरवणे असेल. याशिवाय प्राधिकरण सामाजिक आणि ‘ई-स्पोर्टस’ची नोंदणीदेखील करेल तसेच नियम आणि मार्गदर्शक तत्त्वेदेखील तयार करेल. जगात ‘पब्ज’ खेळणाऱ्यांपैकी सुमारे 25 टक्के लोक भारतात आहेत. अनेक सेलिब्रिटी क्रिकेटपटू आणि चित्रपट तारे आजकाल ऑनलाइन पैशाच्या खेळांचा प्रचार करत आहेत. ‘इंडियन प्रीमियर लीग’ (आयपीएल) संघांच्या जर्सीवरही त्याचा प्रचार केला जात आहे. इतक्या मोठ्या जाहिरातीमुळे ऑनलाइन गेमिंगची लोकप्रियता वाढली आहे असे तज्ज्ञांचे मत आहे.

नव्या विधेयकानुसार कोणतीही व्यक्ती ऑनलाइन पैशाच्या खेळांशी संबंधित जाहिराती तयार करू शकत नाही किंवा त्यात मदत करू शकत नाही. एखाद्या व्यक्तीने असे गेम खेळण्याचा प्रचार केल्यास दोन वर्षांपर्यंत तुरुंगवास किंवा 50 लाख रुपये दंड किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात. नवीन तरतुदींनुसार ऑनलाइन गेमचा प्रचार करणाऱ्या सेलिब्रिटी आणि प्रभावकांना तुरुंगवासाची शिक्षा होऊ शकते. भारताच्या ‘मनी लॉंडरिंग’ विरोधी कायद्यांतर्गत सेलिब्रिटी आणि प्रभावकांवरही खटला दाखल केला जाऊ शकतो. विधेयकाच्या कलम 11 नुसार ‘ऑनलाइन मनी गेम’ चालवणाऱ्या कंपन्यांवर कारवाई करण्याची तरतूद आहे. एखाद्या कंपनीने ‘ऑनलाइन मनी गेम’ ऑफर करून कायदा मोडल्यास त्या कंपनीच्या संचालक, व्यवस्थापक आणि अधिकाऱ्यावर खटला दाखल केला जाईल. विधेयकानुसार, कंपनीच्या स्वतंत्र संचालकावर कोणताही खटला चालणार नाही, कारण ते दैनंदिन निर्णयांमध्ये सहभागी नसतात. विधेयकाचा उद्देश गुन्ह्याच्या प्रकरणात कंपनीच्या खऱ्या जबाबदार लोकांना पकडणे आहे. या विधेयकात ऑनलाइन पैशाचे गेम खेळणाऱ्यांना गुन्हेगारांऐवजी बळी मानले जाते. विधेयकानुसार असे करणारी व्यक्ती दोषी नाही आणि त्याचा उद्देश अशा लोकांना संरक्षण देणे आहे. शिक्षा फक्त पैसे लावून खेळ ऑफर करणाऱ्या आणि प्रोत्साहन देणाऱ्यांनाच दिली जाईल. विधेयकाच्या कलम 1(2) नुसार हा कायदा परदेशातून चालणाऱ्या प्लॅटफॉर्मनाही लागू होईल. अनेक फँटसी स्पोर्टस, बेटिंग, कॅसिनो प्लॅटफॉर्म परदेशातून चालत आहेत. विधेयक लागू होताच सरकार अशा प्लॅटफॉर्मना ब्लॉक करू शकते.

विधेयकाच्या कलम 7 नुसार, बँका ऑनलाइन गेम खेळण्यासाठी पेमेंट ॲप्स किंवा वॉलेट वापरू शकणार नाहीत. कायदा लागू झाल्यानंतर अशा संस्था किंवा कंपन्या ऑनलाइन मनी गेममध्ये पैसे जमा करण्याची किंवा काढण्याची सुविधा देऊ शकणार नाहीत. या विधेयकामुळे अडचणीमध्ये येणाऱ्या काही उद्योगांच्या मते भारतातील दोन लाख कोटी रुपयांचा ‘स्किल गेमिंग’ उद्योग उद्ध्वस्त होऊ शकतो. त्यांनी सरकारकडे या उद्योगावर बंदी घालण्याऐवजी नियमन करण्याची मागणी केली आहे. ‘गेमिंग’ उद्योगाची बाजारपेठ दर वर्षी तीस हजार कोटी रुपयांची आहे. त्यातून सरकारला 20 हजार कोटी रुपयांचा कर मिळतो. असे असले, तरी सरकारला मिळालेल्या महसुलापेक्षा त्यातून होणारे नुकसान जास्त आहे. सुमारे दोन लाख लोक या उद्योगाशी संबंधित आहेत. अंदाजानुसार, 2020 मध्ये देशात गेमर्सची संख्या 36 कोटी होती. 2024 मध्ये ती 50 कोटी झाली आहे. येत्या काळात जगात गेमर्सची संख्या 50 कोटींनी वाढेल. 2030 पर्यंत जागतिक गेमिंग उद्योग 66 हजार कोटी रुप्यांपर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे. भारतात ऑनलाइन गेमिंग उद्योगाचा विकास दर दर वर्षी 32 टक्के इतका आहे. तो जागतिक ऑनलाइन गेमिंगपेक्षा अडीचपट जास्त आहे. सरकारने नियमन केले असले, तरी यात गुंतलेले लोक बेकायदेशीर जुगार प्लॅटफॉर्म आणि ऑपरेटरकडे वळू शकतात. या निर्णयामुळे सुमारे दोन लाख नोकऱ्या, 25 हजार कोटी रुपयांची गुंतवणूक आणि 20 हजार कोटी रुपयांच्या वार्षिक जीएसटी संकलनाला मुकावे लागेल.

आजच्या काळात अनेक राज्य आणि शहर स्तरावरील स्पोर्टस लीग आपल्या अस्तित्वासाठी न्सरकारी नियमांवर अवलंबून असतात. हे क्षेत्र संपल्यास भारतीय क्रिकेट आणि इतर खेळांसाठी प्रतिभेची उपलब्धता कमकुवत होऊ शकते. कायदा प्रतिबंधात्मक असल्यास काही प्लॅटफॉर्म आपले कामकाज परदेशात हलवू शकतात. राष्ट्रपतींकडून मंजुरी मिळाल्यानंतर हे विधेयक कायद्याचे रूप घेईल. ऑनलाइन गेमिंग विधेयकाचा मुख्य उद्देश ‘ई-स्पोर्ट्स’ आणि सोशल गेम्सना प्रोत्साहन देणे आहे. ‘ई-स्पोर्ट्स’ना आता भारतात अधिकृत खेळाचा दर्जा मिळेल. क्रीडा मंत्रालय आता ‘ई-स्पोर्ट्स’साठी नियम आणि मार्गदर्शक तत्त्वे जारी करेल. यासोबतच यासाठी प्रशिक्षण अकादमी आणि संशोधन केंद्र स्थापन केले जाईल. राष्ट्रीय क्रीडा धोरणात ‘ई-स्पोर्ट्स’चा समावेश करण्याची आणि खेळाडूंसाठी प्रोत्साहन योजना राबवण्याची तयारी सुरू आहे. ऑनलाइन गेमिंग विधेयकात स्पष्ट तरतूद करण्यात आली आहे की देशात कोणत्याही प्रकारचे ऑनलाइन जुगार, सट्टेबाजी आणि रिअल मनी गेम खेळण्यास परवानगी दिली जाणार नाही. बँका आणि वित्तीय संस्थांना अशा गेमशी संबंधित व्यवहारांवर बंदी घालावी लागेल. माहिती तंत्रज्ञान कायदा, 2000 अंतर्गत हे प्लॅटफॉर्म ब्लॉक केले जातील. व्यसन, आर्थिक नुकसान, फसवणूक आणि मनी लॉंडरिंगसारख्या समस्यांपासून संरक्षण करण्यासाठी हे पाऊल उचलण्यात आल्याचे सरकारचे म्हणणे आहे.

(अद्वैत फीचर्स)

# कुमकुवत लोकशाही असलेल्या देशातच अराजकता

### भोवताल



**श्याम ठाणेदार**

भारताच्या शेजारी देशात भयानक अराजकता माजली आहे. श्रीलंका आणि बांगलादेशांत जे घडले तेच नेपाळमध्ये घडत आहे. नेपाळच्या के पी शर्मा ओली सरकारने सोशल मीडियावर बंदी घातल्यावर तेथील तरुणाईने ( जेन झी ) मोठा उठाव केला. हा उठाव इतका मोठा होता की नेपाळचे पंतप्रधान के पी शर्मा ओली यांना पदावरून पाय उतार व्हावे लागले. त्यांच्या मंत्रीमंडळातील सहकाऱ्यांना आंदोलकांनी पळू पळू मारले. त्यांची धिंड काढली. नेपाळच्या माजी पंतप्रधानांच्या पत्नीला जिवंत जाळले. राजकीय नेत्यांची घरे जाळली. सरकारी कार्यालयाला आगी लावल्या. नेपाळची संसद आणि सर्वोच्च न्यायालय जाळून खाक केले. या आंदोलनात ५१ नागरिक मरण पावले तर १३०० हून अधिक नागरिक जखमी झाले. नेपाळमध्ये जे घडले तेच श्रीलंकेमध्ये तीन वर्षांपूर्वी घडले. बांग्लादेशातही मागील वर्षी तेच घडले. श्रीलंका आणि बांगलादेशच्या पंतप्रधानांना सत्ता सोडून परदेशात पळ काढावा लागला. त्याचीच पुनरावृत्ती नेपाळमध्ये झाली. नेपाळचे पंतप्रधान के पी शर्मा ओली हेही देश सोडून पळून गेले त्यामुळे नेपाळच्या माजी सरन्यायाधीश सुशीला कार्की यांनी नेपाळच्या हंगामी पंतप्रधानपदाची सूत्रे हाती घेतली. बांगलादेशच्या पंतप्रधान शेख हसीना यांनी बांगलादेश सोडून भारतात आश्रय घेतल्यावर तिथे राजकारणाबाहेरील व्यक्ती असलेल्या मोहम्मद युनूस यांच्याकडे बांगलादेशचे हंगामी पंतप्रधानपद सोपवण्यात आले. मोहम्मद युनूस हे नोबेल पुरस्कारविजेते व्यक्ती आहे. त्यांनी बांगलादेशची सूत्रे स्वीकारल्यानंतर सर्वत्र त्याचे स्वागत करण्यात आले. भारतानेही त्याचे स्वागत केले त्यांच्या कार्यकाळात बांगलादेश आणि भारताचे संबंध दृढ होतील असा विश्वास भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केला होता मात्र झाले उलटेच. मोहम्मद युनूस बांगलादेशचे लष्कर आणि मुलतत्ववाद्यांच्या नादी लागून भारतविरोधी कारवाया करू लागले. चीन आणि पाकिस्तानच्या कच्छपी लागून ते भारताला शत्रू मानून भारताच्या खोड्या काढू लागले. आता नेपाळची सूत्रेही राजकारणाबाहेरील व्यक्तीकडे गेली आहेत त्यामुळे नेपाळमध्येही बांगलादेशची पुनरावृत्ती होते की काय अशी शंका येते. नेपाळमध्ये सत्तेची सूत्रे आता राजकारणाबाहेरच्या व्यक्तीकडे गेली असली तरी राजकीय तरबेज व्यक्तीला देशाबाहेर घालवण्या इतपित तिथे उलथापालथ घडली आहे.( ...की घडवली गेली ? ) राजकीय छक्के पंजे, गुंतागुंतीचे डावपेच नीटसे माहीत नसलेल्या नेपाळच्या या नव्या पंतप्रधानांना तेथील लष्कर व अन्य लोक कळसूत्री बाहुली बनवून ठेवणार नाहीत कशावरून ? बांग्लादेशात आपण हे पाहिले आहे. नेपाळमधील या अराजकतेमागे बाह्य शक्तीचा हात आहे हे लपून राहिले नाही. श्रीलंका, बांगलादेश, नेपाळनंतर कोण ? असा प्रश्न सोशल मीडियावर विचारला जात आहे. काही जण याचे उत्तर भारत असे देत आहे. श्रीलंका, बांगलादेश आणि नेपाळ प्रमाणे भारत ही अराजकतेच्या वाटेवर आहे असे बिंबवण्याचे प्रयत्न चालू आहे. जे श्रीलंका, बांग्लादेश आणि नेपाळमध्ये घडले तेच भारतातही घडवण्यासाठी काही मूलतत्ववादी, अतिरेकी, देशद्रोही घटक व येथील पाताळयंत्री राजकारणी उतावीळ असल्याचे दिसते. जागतिक पटलावर भारताचे वाढते वर्चस्व सहन न होणाऱ्या हित शत्रूंचा भारतातही अराजकता माजवून भारताला कुमकुवत करण्याचा डाव आहे मात्र त्यांचा हा डाव यशस्वी होणार नाही कारण भारतातील नागरिक सुज्ञ असून लोकशाही मानणारे आहेत. भारतीय लोकशाही जगातील सुदृढ लोकशाही आहे. कुमकुवत लोकशाही असलेल्या देशातच अराजकता माजत आहे. भारताची लोकशाही कमकुवत नाही तर ती सुदृढ आहे. भारतासारख्या सुदृढ लोकशाही असलेल्या देशात कधीही अराजकता माजू शकत नाही. संविधान हा आपल्या लोकशाहीचा पाया आहे. अनेक जाती, धर्म, पंथ, भाषा, संस्कृती असूनही आपला देश एकसंध आहे तो केवळ आपल्या संविधानामुळे. बाबासाहेबांनी लिहिलेल्या संविधानामुळेच आपला देश एकसंध आहे. भारतासोबत स्वातंत्र्य झालेल्या शेजारील देशात अनेकदा उठाव, बंड झाले. काही देशात लोकशाही जाऊन हुकुमशाही आली. काही देशावर लष्कराने ताबा मिळवला आपल्या देशात मात्र अजूनही लोकशाही आहे म्हणजेच लोकांचे राज्य आहे. जोवर या देशात बाबासाहेबांनी लिहिलेले संविधान आहे आणि जोवर आपल्या देशात लोकशाही आहे. जोवर देशात लोकशाही आहे तोवर या देशात अराजकता मानणार नाही.

# वाहने भंगारात काढली तर 40 हजार कोटींचा फायदा



जीएसटी सुधारणांमुळे ऑटो क्षेत्राला सर्वाधिक फायदा होऊ शकतो असा तज्ज्ञांचा अंदाज आहे. त्यामुळेच ऑटो कंपन्यांनी आपल्या वाहनांच्या किंमती कमी करण्याची घोषणा केली आहे. दुसरीकडे, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी कमाईचा एक नवीन मंत्र दिला आहे. यासोबतच त्यांनी ऑटो उद्योगाला एक मोठा संदेशही दिला आहे. देशातील सर्व 97 लाख अयोग्य आणि प्रदूषित वाहने रद्द केली, तर भारताला जीएसटीमधून 40 हजार कोटी रुपयांचा फायदा होऊ शकतो, असे गडकरी म्हणाले.

या व्यापक स्वच्छता मोहिमेमुळे केवळ सरकारी महसूल वाढणार नाही, तर 70 लाख रोजगार निर्माण होतील. तसेच पाच वर्षांमध्ये जगातील पहिल्या क्रमांकाचा ऑटोमोबाईल उद्योग बनण्याच्या भारताच्या प्रयत्नांना बळकटी मिळेल. एका अहवालानुसार, स्क्रॅपिंगची सध्याची स्थिती खूपच सामान्य आहे. ऑगस्ट 2025 पर्यंत फक्त तीन लाख वाहने स्क्रॅप करण्यात आली आहेत. त्यापैकी 1.41 लाख सरकारी मालकीची होती. दरमहा सरासरी 16 हजार 830 वाहने स्क्रॅप केली जात आहेत. ही परिसंस्था तयार करण्यासाठी खासगी क्षेत्राने 2700 कोटी रुपये गुंतवले आहेत.

भारताच्या वाहन स्क्रॅपिंग धोरणाला ‘व्हॉलंटरी व्हेईकल फ्लीट मॉडर्नायझेशन प्रोग्राम’ (व्ही-व्हीएमपी) असेही म्हणतात. ते पर्यावरणपूरक पद्धतीने जुन्या, असुरक्षित आणि प्रदूषणकारी वाहनांना टप्प्याटप्प्याने काढून टाकण्यासाठी डिझाइन केले आहे. गडकरी यांनी ऑटोमोबाईल उत्पादकांना नवीन वाहन खरेदी करताना स्क्रॅपेज प्रमाणपत्र सादर करणाऱ्या ग्राहकांना किमान पाच टक्के सूट देऊन स्क्रॅपिंगला प्रोत्साहन देण्याचे आवाहन केले. स्क्रॅपिंग आणि रिप्लेसमेंटचे चक्र उद्योगाची मागणी मजबूत ठेवू शकते. गडकरी यांच्या मते, स्क्रॅपेज धोरणाची प्रभावी अंमलबजावणी ऑटोमोबाईल घटकांच्या किमती 25 टक्क्यांपर्यंत कमी करू शकते, कारण पुनर्नविनीकरण केलेले स्टील, ॲल्युमिनियम आणि इतर साहित्य पुरवठा साखळीत परत आणले जाईल. तसेच, 97 लाख अयोग्य वाहने टप्प्याटप्प्याने काढून टाकल्याने उत्सर्जन कमी होईल,

गडकरी यांच्या मते भारताच्या सध्याच्या ऑटोमोबाईल उद्योगाचा आकार 22 लाख कोटी रुपये आहे, तर चीनचा 47 लाख कोटी रुपये आणि अमेरिकेचा 78 लाख कोटी रुपये आहे. आपण पुढील पाच वर्षांमध्ये भारताचा ऑटोमोबाईल उद्योग जगात क्रमांक एकचा बनवू, असे गडकरी म्हणाले. भारत सध्या कच्च्या तेलाच्या आयातीवर दर वर्षी 22 लाख कोटी रुपये खर्च करतो. या आयातीशी संबंधित प्रदूषणामुळे ही समस्या आणखी गंभीर बनली आहे.

## दास-वाणी

नाना विखारे आजगर ।
नाना मगरें जळचर ।
नाना वनचरे अपार ।
या नांव आदिभूतिक ।।
अश्व वृषभ आणी खर ।
स्वान शूकर जंबुक मार्जर ।
ऐसी बहुविध क्रूर ।
या नांव आदिभूतिक ।।

।। जय जय रघुवीर समर्थ ।।
दासबोध:०३/०७/११-१२

पंचमहाभूतांनी घडलेल्या या सृष्टीवरील कोणत्याही चर अचर पदार्थ अथवा प्राणीमात्रापासून शरीराला झालेले कोणत्याही प्रकारचे दुःख म्हणजे आधिभौतिक ताप होय.

विखार म्हणजे विषारी सर्पाचा दंश.

जगंलातून जाताना अजगराचा पडलेला प्राणघातक विळखा.नदीमधे मगरीच्या जबडयात सापडणे किंवा पाण्यातील छोटयामोठया जलचरांचे चावे. सिंह,लांडगे,अस्वले अशा जंगलातील श्वापदांचे हल्ले ही आधिभौतिक तापाची काही उदाहरणे होत.

तसेच घोडे,बैल,गाढव इत्यादी पाळीव प्राण्यांपासून होणारा त्रास.

तसेच कुत्री,डुकरे,कोल्हे, रानमांजरे अशा क्रूर प्राण्यांमुळे शरीराला होणारे अपाय.

हे देखील आधिभौतिक तापांमधे मोडतात.

इथे शरीरातुन उमटणारी व्याधी नाही तर बाह्य आक्रमण हे दुःखाचे कारण आहे.

आधिभौतिक ताप

श्रीराम
सुप्रभात
मिलिंद

# पुढाऱ्यांच्या हस्तक्षेपाने गोदावरी प्रदूषित

## मनसे न्यायालयीन लढ्याच्या तयारीत

हरिभाऊ लाखे

**नाशिक : ज्या गोदावरीच्या काठावर पुढील दीड वर्षात सिंहस्थ कुंभमेळा भरणार आणि लाखो भाविक या ठिकाणी पवित्र स्नानाचा योग साधणार आहेत, त्या नदीचे पावित्र्य महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या दुर्लक्षामुळे धोक्यात आल्याची तक्रार मनसेने केली आहे. स्नानासाठी येणाऱ्या भाविकांना गोदावरी नदी परिसरात घाणीचे साम्राज्य पाहून अक्षरशः किळस येते.**



नदीचे पवित्र पाणी दुर्गंधित झाले आहे. यास जबाबदार असणाऱ्यांवर कारवाई आणि पुढील काळात नदीचे पावित्र्य जपले न गेल्यास जनआंदोलनाबरोबर न्यायालयीन लढा देण्याचा इशारा देण्यात आला आहे. २०२७ मध्ये होणाऱ्या कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर, गोदावरी नदी प्रदूषणाचा विषय ऐरणीवर आला आहे. नाशिक नगरीचे नाव उंचावण्यास गोदावरी नदीचे योगदान आहे. या नदीतून शेतीसह लाखो नागरिकांची तहान भागवली जाते. देशभरातील भाविकांची गोदावरी श्रध्दास्थान आहे. काही उद्योगांनी दूषित पाणी सोडून गोदावरीला अपवित्र केले असून सध्या गोदावरीसह तिच्या उपनद्यांची अवस्था अत्यंत बिकट झाल्याचा मुद्दा मनसेच्या पदाधिकाऱ्यांनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी हेमंत कुलकर्णी यांच्यासमोर मांडला. गोदावरी, नंदिनी, वालदेवी, दारणा नद्यांच्या प्रदूषणासंदर्भात निवेदन दिले. ज्या पवित्र गोदावरीचे पाणी तीर्थ म्हणून प्राशन केले जाते, त्याच नदीचे पाणी आज पिण्यासाठी भीतीदायक ठरत आहे. दूषित पाण्याने जीवितास आणि शेती व्यवसायात मोठ्या अडचणी निर्माण होऊ शकतात.

जगभरातून भाविक गोदावरीत स्नानासाठी येतात. प्रदूषणामुळे नाशिकसह गोदावरी नदीचे नाव खराब होत असल्याकडे मनसे प्रदेश सरचिटणीस दिनकर पाटील, प्रदेश उपाध्यक्ष सलीम शेख, जिल्हाध्यक्ष अंकुश पवार, शहराध्यक्ष सुदाम कोंबडे आदींनी लक्ष वेधले. कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर, गोदावरी नदीच्या स्वच्छतेसाठी व्यापक कार्यक्रमांची आवश्यकता आहे. सर्व नद्यांचे लेखापरीक्षण करून कसूर असणारे उद्योग, संस्थांसह अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, अन्यथा मनसेकडून आंदोलनाचा मार्ग स्वीकारला जाईल.

# लोक जनशक्ति पार्टीच्या कोकण विभाग प्रभारीपदी गणेश भोईर यांची नियुक्ती




कल्याण:

लोक जनशक्ती पार्टीच्या (रामविलास) कोकण विभाग प्रभारी पदी गणेश भोईर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष प्रमोद कुदळे यांनी हि नियुक्ती केली आहे. फुले शाहू आंबेडकर यांच्या विचार प्रणालीने व राम विलास पासवान यांच्या कल्पनेतून स्थापन झालेल्या तसेच राष्ट्रीय अध्यक्ष चिराग पासवान यांच्या प्रेरणेने विचाराने कार्यरत असलेल्या या पार्टीमध्ये पक्ष नेतृत्वावर निष्ठा ठेवून गणेश भोईर यांची कोकण विभाग प्रमुख प्रभारी पदी व महाराष्ट्र राज्य सह संघटक देण्यात आली आहे.

# नोव्हाकुरों नॅचरल्सचा पाळीव प्राण्यांच्या काळजीच्या क्षेत्रात विस्तार

ठाणे :




पाळीव प्राण्यांच्या नैसर्गिक आरोग्यवर्धनासाठी नाविन्यपूर्ण उपाययोजना करणारी नोव्हाकुरों नॅचरल्स ही स्वदेशी कंपनी नव्या उत्साहाने पुढे सरसावत आहे. तिच्या प्रमुख उत्पादनांपैकी 'कूलसिम' थंडावा देणारे अँटिसेप्टिक मिस्ट, आणि 'ओ-नो-पेन' वेदनाशामक हर्बल उपाय, यांच्या यशस्वी लाँचनंतर आता कंपनी पाळीव प्राण्यांच्या स्टाइलच्या जगात पाऊल टाकत आहे. आराम, टिकाऊपणा आणि आकर्षकतेचा संगम असलेल्या नवीन हार्नेस व लीशेसच्या श्रेणीची घोषणा करण्यात आली आहे.

प्राण्यांच्या आरोग्याबाबत कंपनी एवढ्यावरच थांबलेली नाही. नोव्हाकुरों नॅचरल्सच्या प्रयोगशाळेत सध्या टिक-नियंत्रणासाठी एक विशेष फॉर्म्युलेशन तयार होत आहे, जे लवकरच कंपनीच्या ग्रूमिंग विभागात दाखल होणार आहे. हे नाविन्यपूर्ण उत्पादन सुरक्षित, नैसर्गिक आणि विज्ञाननिष्ठ देखभालीच्या वचनाला अनुसरून पाळीव प्राण्यांना परजीवींपासून दूर ठेवणार आहे.

"आपल्या पाळीव प्राण्यांना जसे प्रेम मिळते तसेच त्यांना विचारपूर्वक, उपयुक्त उत्पादनेही मिळायला हवीत," असे वैदेही गुप्ते, संस्थापक नोव्हाकुरों नॅचरल्स यांनी सांगितले. "आम्ही प्रत्येक नवीन उत्पादनासह केवळ शेल्फवरील वस्तू वाढवत नाही.

# नरेंद्र मोदी-गणेश नाईक यांच्या वाढदिवसानिमित्त १५० झाडांचे वृक्षारोपण

ठाणे :

**पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून रुद्र प्रतिष्ठान आणि वन विभागाच्या संयुक्त विद्यमाने ठाण्यातील शीळ डायघर विभागात वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विविध प्रजातीचे सुमारे दिडशे झाडे लावण्यात आली.**




रुद्र प्रतिष्ठान आणि जय फाउंडेशनचे प्रमुख धनंजय सिंह म्हणाले, माजी खासदार संजीव नाईक यांच्या नेतृत्वाखाली पर्यावरण संरक्षणाचे विविध उपक्रम आयोजित केले जातात. राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांचा ७५ वा वाढदिवस नुकताच साजरा करण्यात आला. आज बुधवारी संपूर्ण देश पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा जन्मदिन साजरा करत आहे. त्यानिमित्ताने रुद्र प्रतिष्ठान आणि वन विभागाच्या संयुक्त विद्यमाने वृक्षारोपणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमासाठी वनाधिकारी तुषार कुळखे, कृष्णा पोळ, पोलीस उपनिरीक्षक महेंद्र जाधव, सामाजिक कार्यकर्ते संभाजी सूर्याजी राव, विनोदकुमार गुप्ता, अमित सिंह, भगवान सिंह, वनविभागाचे कर्मचारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाच्यावतीने आरोग्य शिबिर

कल्याण :



शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष कल्याण ग्रामीण शहरप्रमुख अमित कोळेकर यांच्या माध्यमातून, ईशा नेत्रालय व जेनेसिस हॉस्पिटल यांच्या संयुक्त विघमाने आमदार राजेशजी मोरे यांच्या वाढदिवसानिम्मित वॉर्ड क्र. 17 पिसवली पाईप लाईन रोड येथे भव्य आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या मध्ये बहुतांश नागरिकांनी त्याचा लाभ घेतला. त्यामध्ये मोफत आरोग्यचाचणी, डोळेतपासणी, मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया तसेच इतर बाबींवर मार्गदर्शन देखील करण्यात आले. प्रसंगी आमदार राजेश मोरे यांची उपस्थिती लाभली. तसेच उपतालुका प्रमुख विलास भोईर, विभागप्रमुख रणजित चौहान, शाखाप्रमुख दीपक मिश्रा, श्रीपत भोईर आदींसह महिलावर्ग, सामान्य नागरिक, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# यशस्वीनगर-हायलॅण्ड नवरात्रोत्सवात सोमनाथ मंदिराची ३५ फुटांची प्रतिकृती

## आमदार संजय केळकर यांची माहिती, निलेश पाटील यांच्याकडून आयोजन

ठाणे :

यशस्वीनगर-हायलॅण्ड सार्वजनिक नवरात्रौत्सव मंडळातर्फे यंदा प्रथमच नवरात्रौत्सव साजरा केला जाणार असून, मंडळातर्फे गुजरातेतील प्रसिद्ध सोमनाथ मंदिराची ३५ फूट उंच प्रतिकृती उभारण्यात येणार आहे. त्याचबरोबर उत्सवाच्या परिसरात आकर्षक रोषणाई, दररोज नवचंडी यज्ञासह विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रम पार पडतील, अशी माहिती भाजपाचे आमदार व मंडळाचे प्रमुख मार्गदर्शक संजय केळकर यांनी दिली. या वेळी मंडळाचे संस्थापक अध्यक्ष व भाजपाचे ब्रह्मांड-बाळकूम मंडल अध्यक्ष निलेश दिनेश पाटील यांचीही उपस्थिती होती.

शारदीय नवरात्रौत्सवानिमित्ताने यशस्वीनगर, हायलॅण्ड, ढोकाळी परिसरातील नागरिकांच्या वतीने यंदा यशस्वीनगर-हायलॅण्ड सार्वजनिक नवरात्रौत्सव मंडळाची स्थापना करण्यात आली. मंडळाचे संस्थापक अध्यक्ष म्हणून निलेश पाटील यांची निवड झाली. त्यानंतर हायलॅण्ड सोसायटीलगतच्या मैदानात यंदा प्रथमच भव्य स्वरुपात सार्वजनिक नवरात्रौत्सव भरविला जाणार आहे. २२ सप्टेंबर ते २ ऑक्टोंबरपर्यंत होणाऱ्या या नवरात्रौत्सवाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह विविध नेते, मान्यवरांना निमंत्रित करण्यात आले आहे.

मंडळाने पहिल्याच वर्षी भव्य देखावा साकारण्याचे ठरविले असून, गुजरातेतील सोमनाथ मंदिराची प्रतिकृती उभारण्यात येत आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी सोमनाथ मंदिराचा जीर्णोद्धार केला होता. त्यांचे यंदा त्रिशताब्दी वर्ष सुरू असून, या देखाव्यातून अहिल्यादेवींच्या कार्याविषयी कृतज्ञता व्यक्त केली जाईल. पुण्यातील दगडूशेठ हलवाई, मुंबईतील फोर्टचा राजा मंडळाच्या गणेशोत्सवातील कला दिग्दर्शक ओमकार गुरव यांच्याकडून देखावा साकारला जात आहे. या उत्सवानिमित्ताने संपूर्ण यशस्वीनगर, ढोकाळी परिसरात आकर्षक रोषणाई केली जाईल. तसेच भव्य झुंबर व स्वागत कमान उभारली जाईल. २२ सप्टेंबर रोजी देवीच्या स्थापनेआधी नगर परिक्रमा केली जाणार असून, त्यात ५००-६०० भाविकांची उपस्थिती असेल. त्यानंतर नाशिक येथील प्रसिद्ध वे. शा. सं. मुकुंदशास्त्री मुळे यांच्या हस्ते देवीची प्राणप्रतिष्ठापना केली जाईल.

# माणिक मोती कार्यक्रमाला कल्याणकर रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद





कल्याण :

**कल्याणमध्ये राष्ट्रसेविका समितीच्या हातात हात घालून चालणारे अशी ओळख असलेले उज्वला मंडळ यंदा 76 व्या वर्षात पदार्पण करीत आहे. विविध सामाजिक धार्मिक शैक्षणिक वैद्यकीय उपक्रम करीत असताना कल्याणकरांना थोडी मनोरंजनाची मेजवानी पण द्यावी असा मानस ठेवून मंडळ वर्षातून एकदा मनोरंजनाचा कार्यक्रम करत असते.**

यंदा सुप्रसिद्ध गायिका माणिक वर्मा यांच्या जन्मशताब्दी वर्ष ही संधी साधून तसेच सुप्रसिद्ध कलाकार अशोक हांडे यांना मिळालेला प्र. के. अत्रे पुरस्कार यांची सांगड घालून कल्याणच्या अत्रे नाट्य मंदिरात चौरंगनिर्मित अशोक हांडे सर्वेसर्वा असलेला माणिक मोती या कार्यक्रमाचे आयोजन नुकतेच करण्यात आले. या सुमधुर बहारदार गाण्यांच्या कार्यक्रमाचा आस्वाद कल्याणकर रसिक श्रोत्यांना मिळाला. माणिक वर्मांच्या मुलींचा यातील सहभाग हेही या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य होते. त्यांना इतर कलाकार गायक वादक यांची छान साथ मिळाल्यामुळे कार्यक्रम रंगतदार झाला.

हा कार्यक्रम दृकश्राव्य पद्धतीने सादर झाला. कल्याणच्या रसिक आणि दर्दी प्रेक्षकांनी कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. उज्वला मंडळांनी सुगंधित अत्तर लावून रसिकांचे केलेले स्वागत आणि कार्यक्रमाचे सुयोग्य नियोजन याचे सर्वांनी खूप कौतुक केले. उज्वला मंडळाच्या सर्वच कार्यक्रमांना कल्याणकर रसिक नेहमीच चांगला प्रतिसाद देत आहेत. तसाच यापुढेही देतील असा विश्वास आहे त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक धन्यवाद व चौरंगाच्या सर्व कलाकारांचे सुद्धा आभार. उज्वला मंडळाच्या सर्व कार्यकर्त्यांनी कार्यक्रम सफल करण्यात भरपूर मेहनत घेतली. असल्याची माहिती मंडळाच्या अध्यक्षा सुनीता केळकर यांनी दिली.

## महाशब्दकोडे 600



### आडवे संकेत

1) विवाहसंबंधापासून न झालेले
5) मुख्य नायक, नेता
8) रसिक, रस घेणारा, आस्वाद घेणारा
9) चुलता, वडिलांचा भाऊ
10) नवऱ्याचा वडील बंधू
12) एक विदेशी मद्य प्रकार
13) काम, धंदा, कृत्य
14) एकरुप झालेला, मिसळून गेलेले, नम्र
15) जाळणे, अग्निसंस्कार
17) विविध माध्यमांद्वारे करण्यात येणारी उत्पादनांची प्रसिद्धी
19) चक्षु, नेत्र
21) सद्वर्तनी, चारित्र्यवान
23) मंडलाकार भ्रमण पावणारा मोठा वारा, झंझावात
24) अंगठीत बसविलेला हिरा किंवा खडा
26) सेवक, चाकर
27) लाकूड तासण्याचे एक हत्यार, वाकस
29) धूळ, कण
31) विस्तार, फैलावणे
33) चैतन्य, अंतःकरणाची शुद्धी
35) पू, जखमेतून निघणारा घाणेरडा द्रवांश
37) दुसऱ्यांवर अवलंबून राहणारा
40) घाण, विष्ठा
41) रुंद तोंड असलेली आखूड बंदूक, कडाबीन
43) पूर्वजांचा गद्यभाषेतील इतिहास
44) लिंबू, साखर व सुगंधी द्रव्यात पाण्यात घालून तयार केलेले पेय
45) उणीव, तोटा
47) रान, जंगल
48) दुर्दशा, अवस्था
49) तिंबलेली, मळलेली कणिक, खुराक, पौष्टिक अन्न
51) महारोग, महाव्याधि
55) निर्भत्सना, धिक्कार (हिं)
57) ताक घुसळण्याचे काष्ठयंत्र
58) कलमांमधील गौण कलम
60) आनंदाचा विरस होणे, हिरमोड
62) कुळपरंपरा, पाया
64) तासून काढणे, छिलणे
65) कापड मोजण्याचे एक परिमाण
67) सगेसोयरे
69) तबल्याचा सोबती
70) चलाख, तरतरीत
72) भीतीने घाबरणे
75) व्याजाच्या हिशेबाचा एक प्रकार
77) अंदाधुंदीने चालविलेले राज्य, अराजकता
79) एक प्रकारचा पायघोळ अंगरखा
80) जिम्मा, जोखीम
82) वायू, हवा, वारा
84) संबंध जोडणे, विवाह जुळल्यावर होणारे नातेसंबंध
85) जमलेले लोक, समूह, समुदाय
86) पू, जखमेतून निघणारा घाणेरडा द्रव

### उभे संकेत

1) अयोग्य वेळी झालेले, अप्रासंगिक
2) नावेत बसून जलविहार करणे
3) विचारविनिमयासाठी सदस्यांनी एकत्र जमणे
4) डुक्कर
5) नेहमी, निरंतर
6) दरवाजाची फळी
7) मुसलमानी वर्षाचा नववा महिना
8) चंदेरी मुलामा
11) अनेक मजली इमारतीत असलेला फ्लॅट
13) तुरुंगवास
16) धातूचे चलनी नाणे
18) कितीही उगाळला तरी हा काळाच राहतो
20) लहान शहर
22) गंध, राहणे
25) अलंकारशास्त्रात शृंगाराचा एक प्रकार, नायक नायिकेचा विरह
27) गायनात निरनिराळ्याा सुरांनी केलेला रागाचा विस्तार
28) स्वतंत्र भारताचे एक भूतपूर्व पंतप्रधान
30) देवाचे एकसारखे केलेले नामस्मरण
32) शाबूत, मजबूत, सिद्ध झालेले (हिं)
33) राजाजवळ उभा असलेला छडीदार सेवक
34) सारखे
36) खोल, खोलगट
38) रासक्रीडा
39) देवाने प्रसन्न होऊन दिलेली देणगी
40) माजलेल्या हत्तीच्या गंडस्थळातून स्त्रवणारा द्रव
42) कौतुक, प्रशंसा
46) पलंगासारखी मोठी लाकडी बैठक
50) युद्धात शत्रुपक्षाचे सैनिक कापून काढणे
52) मारणे, झोडपणे
53) असंख्य पायांचा एक जीवाणू
54) भंग न पावलेले
56) तपस्वी, ऋषी, सूर्य
59) एका बाजूस पडणे, आडवे होणे
61) हत्तीच्या चालीसारख्या संथ गतीने चालणारी स्त्री
63) जुन्या फाटक्या वस्त्राला लावलेला जोड
64) पिता, वडील
66) तळपायाचा फुगीर भाग
68) एकंदर बेरीज
71) गांव कुळकर्णी, तलाठी
72) दुजाभाव, भिन्नत्वाची भावना
73) हाल, दुर्दशा
74) इस्लाममध्ये अल्लाच्या नावांपैकी एक, दयाळू
75) हस्त, हात
76) टिंगल, थट्टा
78) पाप, अपराध
79) अंगावर पांघरण्याचे एक उंची रेशमी वस्त्र
80) यश, विजय 81) बगळा
83) वृक्षादिकांमधून निघणारे दूध, डिंक, चिकट द्रव

(उत्तर पुढील अंकी )

### मागील महाशब्दव्यूहचे उत्तर



uday munde - 8446302691

## थोडक्यात

### रस्ते अपघात व वाहतूक कोंडीवर गडकरींकडे मागणी

मुंबई : रस्ते वाहतूक कोंडी व अपघातांवर तातडीने उपाययोजना करावी व प्रवासी व वाहन चालकांना दिलासा द्यावा. अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते व लेखक अशोकराव टाव्हरे यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेऊन केली. तळेगाव-चाकण-शिक्रापुर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८ डी व पुणे-नाशिक महामार्ग क्रमांक ६० वरील नाशिक फाटा-राजगुरुनगर या महामार्गांसाठी हजारो कोटी रुपयांचे प्रकल्प मंजूर असूनही प्रत्यक्ष कामाला गती मिळालेली नाही. मोशी, कुरूळी, चाकण, आळंदी फाटा आदी ठिकाणी दररोज प्रचंड वाहतूककोंडी होत आहे. पावसामुळे रस्त्यांना खड्डे पडल्याने अपघातांचे प्रमाणही वाढले आहे. नाशिक फाटा-राजगुरुनगर मार्गाची निविदा २५ सप्टेंबरला उघडणार असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. मात्र नागरिकांना त्वरित दिलासा मिळावा, यासाठी काम लवकर सुरू करावे, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

### ठाणे जिल्ह्यात जनावरांच्या लाळ-खुरकूत (FMD) प्रतिबंधासाठी लसीकरण मोहीम सुरु

ठाणे : ठाणे जिल्ह्यातील पशुपालक, गोपालक आणि शेतकऱ्यांसाठी एक महत्त्वाची मोहीम राबविण्यात येत आहे. २० व्या पशूगणनेनुसार जिल्ह्यात एकूण १,७२,०४३ जनावरे नोंदवली गेली असून, या जनावरांचे आरोग्य सुरक्षित ठेवण्यासाठी आणि संसर्गजन्य आजारांपासून बचाव करण्यासाठी लाळ-खुरकूत (FMD) लसीकरण मोहीम सुरु करण्यात आली आहे. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अजिंक्य पवार, प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन मुंबई डॉ. प्रशांत कांबळे यांच्या विशेष मार्गदर्शनाने लसीकरण मोहीम सुरू केली आहे. जिल्ह्यातील सर्व पशुवैद्यकीय दवाखान्यांमध्ये लाळ-खुरकूत रोग प्रतिबंधक लसीचा पुरेसा साठा उपलब्ध करून देण्यात आला आहे. त्यामुळे पशुपालकांना आपल्या जनावरांचे लसीकरण करण्यासाठी जवळच्या पशुवैद्यकीय केंद्राशी संपर्क साधून ही सुविधा घेता येणार आहे.

# मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानाचा आदिती तटकरे यांच्या हस्ते शुभारंभ

**अशोक गायकवाड**

रायगड : गावांचा शाश्वत विकास साधण्यासाठी मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानाची घोषणा करण्यात आली असून जिल्ह्यात हे अभियान१७ सप्टेंबर ते ३१ डिसेंबर २०२५ या कालावधीत राबविण्यात येणार आहे. या अभियानाचा शुभारंभ पळस्पे ग्रामपंचायतीच्या वतीने आयोजीत करण्यात आलेल्या ग्रामसभेस उपस्थित राहून ग्रामस्थांसोबत संवाद साधून महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आला. यावेळी मुख्य कार्यकारी नेहा भोसले, गटविकास अधिकारी पनवेल समीर वाठारकर यांच्यासह मंडळ अधिकारी, ग्रामसेवक तसेच महिला बचतगटाच्या महिला आणि ग्रामस्थ मोठ्या




संख्येने उपस्थित होते. यावेळी महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या की, मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियान आजपासून संपूर्ण राज्यात सुरु होत आहे. मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियानाच्या माध्यमातून गावाचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी ग्रामपंचायत पदाधिकारी, अधिकारी व सर्व ग्रामस्थांनी मिळून यशस्वी प्रयत्न करावेत व सर्वोत्तम कामगिरी करावी. या अभियानांतर्गत राज्य शासनाने ग्रामपंचायतींना विविध विकासकामांमध्ये स्पर्धा करण्याची संधी देत लाखो रुपयांच्या पारितोषिकांची घोषणा केली आहे. ग्रामपंचायतींना प्रथम क्रमांकासाठी १५ लाख, द्वितीय क्रमांकासाठी १२ लाख, तर तृतीय क्रमांकासाठी ८ लाख रुपयांची बक्षिसे देण्यात येणार आहेत. विभाग, जिल्हा व तालुका स्तरावर देखील स्वतंत्र बक्षिसे देण्यात येतील. राज्यातील सर्व ग्रामपंचायतींमध्ये १७ सप्टेंबर ते ३१ डिसेंबर या कालावधीत हा उपक्रम राबवला जाणार आहे. अभियानाचे उद्दिष्ट ग्रामपातळीवर सुशासनयुक्त आणि सक्षम पंचायत उभारणे, जल समृद्धी, स्वच्छ व हरित गाव निर्मिती, सरकारी योजनांचा प्रभावी अंमल, लोकसहभाग वाढविणे आणि नाविन्यपूर्ण उपक्रमांना प्रोत्साहन देणे हे आहे.

## कोपरी वॉटरफ्रंट प्रकल्पात भ्रष्टाचाराचा आरोप

### ठेकेदाराला काळ्या यादीत टाकण्याची काँग्रेसची मागणी

**अनिल ठाणेकर**

ठाणे : कोट्यवधींच्या खर्चातून उभारण्यात आलेल्या ठाण्यातील कोपरी वॉटरफ्रंट प्रकल्पातील भ्रष्टाचार, निकृष्ट दर्जा व झटपट झालेली दुरवस्था या पार्श्वभूमीवर काँग्रेसने ठेकेदाराला काळ्या यादीत टाकण्याची मागणी केली आहे. तसेच, या संपूर्ण प्रकल्पाची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी आग्रही मागणी काँग्रेस प्रवक्ते राहुल पिंगळे यांनी मुख्यमंत्र्यांकडे दिलेल्या निवेदनातून केली आहे.

स्मार्ट सिटी योजनेअंतर्गत उभारण्यात आलेल्या या प्रकल्पाचे उद्घाटन मार्च २०२३ मध्ये करण्यात आले होते. या प्रकल्पांतर्गत अंमलात आणलेल्या ॲम्पी थिएटरला तडे जाणे, भिंतींना भेगा पडणे, गझिबोतील आसनांची मोडतोड, तसेच सजावटीसाठी वापरण्यात आलेल्या चौथऱ्यांचे दगड उखडणे असे गंभीर दोष उघडकीस आले आहेत. प्रकल्पाच्या दोषदायित्व कालावधीची मुदत संपली असली, तरी प्रशासनाने ठेकेदाराच्या खर्चातूनच दुरुस्ती करण्याचे आदेश दिले आहेत. मात्र काँग्रेसने हे स्पष्टीकरण फोल ठरवत, "दर्जेदार काम झाले असते तर एवढ्या लवकर दुरुस्तीची गरजच पडली नसती," असा घणाघात केला आहे.

काँग्रेसने या प्रकरणात ठेकेदाराला काळ्या यादीत टाकण्याची, तसेच संबंधित अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करून कारवाई करण्याची मागणी केली आहे.

## न्यू इंग्लिश स्कूलच्या शतक महोत्सवी वर्षानिमित्त

### आंतरशालेय प्रश्नमंजुषा स्पर्धा संपन्न

**ठाणे :**

**पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या राम मारुती रोडवरील न्यू इंग्लिश स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजचे शतक महोत्सवी वर्ष व इंग्लिश मिडियम प्रायमरी स्कूलच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त वर्षभर विविध इंटर स्कूल स्पर्धांचे, सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आलेले आहे. न्यू इंग्लिश स्कूलच्या भोळे सभागृहात प्रश्नमंजुषा या इंटर स्कूल स्पर्धेचे आयोजन नुकतेच करण्यात आले होते.**

स्पर्धेसाठी ठाणे शहरातील शाळांच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. प्रश्नमंजुषा स्पर्धा ही इयत्ता पाचवी ते बारावी विद्यार्थ्यांसाठी तीन गटात घेण्यात आली. स्पर्धेत सहभागी विद्यार्थ्यांनी विज्ञान, गणित, इतिहास, भूगोल, चालू घडामोडी आणि सामान्य ज्ञान या विषयांवर उत्तरे देत उल्लेखनीय गुण मिळवले. त्यांच्या तयारीतील



सखोलता, वेगवान विचारशक्ती आणि आपल्या गटाची संघभावना प्रकर्षाने जाणवली.

स्पर्धेनंतर बक्षीस वितरण समारंभ पार पडला. विजेत्या विद्यार्थ्यांना संस्थेचे कार्यवाह आल्हाद जोशी यांच्या शुभ हस्ते प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. प्रमुख पाहुणे जोशी सर यांनी आपल्या भाषणात प्रश्नमंजुषा स्पर्धेत भाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे कौतुक केले. अशा स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांमधील सुप्त गुणांना, विचारशक्तीला चालना मिळते. प्रश्नमंजुषा स्पर्धा ही केवळ ज्ञान मोजणारी परीक्षा नसून आत्मविश्वास वाढवण्याचे, विचारांना चालना देण्याचे, संघ भावना विकसित करण्याचे साधन आहे. स्पर्धेमध्ये होणारी हार-जीत याने खचून न जाता चुका सुधारून पुढच्या स्पर्धेत अधिक जोमाने सहभागी व्हा असे आवाहन त्यांनी केले.



ठाणे महापालिकेच्यावतीने बुधवार, १७ सप्टेंबर रोजी केशव सिताराम ठाकरे उर्फ प्रबोधनकार ठाकरे यांची जयंती साजरी करण्यात आली. त्यानिमित्ताने, महापालिका मुख्यालयातील कै. नरेंद्र बल्लाळ सभागृह येथे केशव सिताराम ठाकरे उर्फ प्रबोधनकार ठाकरे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमास अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे, उपायुक्त (माहिती व जनसंपर्क) उमेश बिरारी, माहिती व जनसंपर्क अधिकारी रवींद्र मांजरेकर यांच्यासह महापालिकेचे अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

### तब्बल एकच पत्यावरील 8 वेगवेगळी लोक टोईंग व्हॅन वर बनावट कागदपत्र बनवून कामावर

## ठाण्यातील वाहतूक विभागाचा अजबगजब कारभार!

**सलमान पठाण**

ठाणे : ठाणे वाहतूक पोलिसांच्या टोईंग व्हॅन कामकाजात गंभीर अनियमितता झाल्याचा धक्कादायक भंडाफोड सामाजिक कार्यकर्ते अजय जया यांनी केला आहे. १७ ऑगस्ट रोजी त्यांनी स्पष्ट दाखवून दिले की वाहतूक विभागाने निश्चित केलेल्या एसओपी (SOP) नियमांचे पालन होत नाही आणि या संपूर्ण प्रक्रियेत मोठ्या घोटाळ्याचा संशय आहे.

माहितीच्या अधिकाराखाली (RTI) मिळालेल्या कागदपत्रांनुसार, टोईंग कामगारांच्या कॅरेक्टर सर्टिफिकेट्स व पोलिस व्हेरिफिकेशन सर्टिफिकेट्समध्ये गंभीर गैरप्रकार उघडकीस आले आहेत. अनेक कामगारांनी एकच पत्ता दिलेला असून काहींनी अपूर्ण पत्ते दिल्याने त्यांची पडताळणी करणे अशक्य ठरले आहे. उदाहरणार्थ, सलीम पठाण नावाच्या कामगाराचा पत्ता सहार अपार्टमेंट, लोकमान्य नगर, फ्लॅट 503 असा दाखवला गेला होता.

मात्र प्रत्यक्षात त्या ठिकाणी गणेश निषाद यांचा परिवार राहतो. त्याचप्रमाणे, कोपरी परिसरात दाखवलेले पत्ते पूर्णतः बनावट असल्याचे निष्पन्न झाले असून, कसारवडवली येथे ८ जणांचा पत्ता एकच, तर मुंब्रा–कौसा येथे ७ जणांचा पत्ता एकाच ठिकाणी दाखवण्यात आल्याचे समोर आले आहे.

या सर्व घटनांमधून हे स्पष्ट होते की मोठ्या प्रमाणावर बनावट कॅरेक्टर सर्टिफिकेट्स तयार करण्यात आले आहेत. पोलिस पडताळणी ही संबंधित व्यक्तीचा खरा पत्ता व गुन्हेगारी पार्श्वभूमी तपासण्यासाठी केली जाते, मात्र खोटे पत्ते वापरून अनेक कामगारांच्या खरी ओळख आणि त्यांच्या पार्श्वभूमीवरील गुन्हे झाकले गेले असावेत, असा गंभीर संशय आहे.

या प्रकरणाची थेट जबाबदारी ठाणे पोलिस प्रशासन व वाहतूक विभागाचे डीसीपी पंकज शिरसाट यांच्यावर निश्चित असल्याचे अजय जया यांनी सांगितले.

त्यांनी तात्काळ स्वतंत्र चौकशी समिती नेमून संशयास्पद टोईंग कामगारांना निलंबित करण्याची तसेच बनावट पडताळणी मंजूर करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. अजय जया यांनी हेही स्पष्ट केले की नागरिकांच्या आंदोलनानंतर वाहतूक विभागाने टोईंग व्हॅनवर सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याचे आणि सर्व SOP नियमांचे पालन करण्याचे आश्वासन दिले होते.

परंतु प्रत्यक्षात कोणतीही अंमलबजावणी झाली नाही, उलट या संपूर्ण प्रक्रियेतून मोठा घोटाळा उघडकीस आला आहे.

## मुरबाड नगरपंचायतचे आठ नगरसेवक शिंदे गटाच्या गळाला

### भरकटलेला नगराध्यक्ष मैदान सोडून पळाला..?

**राजीव चंदने**

मुरबाड: मुरबाड नगरपंचायतचे नगराध्यक्ष संतोष चौधरी यांचेसह आठ नगरसेवकांनी आमदार किसन कथोरे यांचे विरोधात बंड करुन परिवर्तन पॅनेलची स्थापना करत शिंदे गटात प्रवेश केला. हे नऊ नगरसेवक जर एकत्र असते तर मुरबाड नगरपंचायत मध्ये मोठी राजकीय उलथापालथ झाली असती.परंतु प्रवेश करताना नगराध्यक्ष संतोष चौधरी यांनी पळ काढत भुमिगत झाल्याने नगरपंचायतचे घडामोडी ना पुर्ण विराम मिळाला आहे.

मुरबाड नगरपंचायत वर भाजपचे ११ सेनेचे ५ आणि अपक्ष १ असे संख्याबळ असताना आमदार किसन कथोरे यांची एकहाती सत्ता होती. मात्र राज्यात भाजप सेनेची सत्ता असल्याने आमदार किसन कथोरे यांनी उपनगराध्यक्ष पदासाठी सेनेला संधी दिली असता.इच्छित नगरसेवकामध्ये गटबाजी होऊन फुट पडली.त्यामध्ये नगराध्यक्ष संतोष चौधरी हे सहभागी झाल्याने त्यांनी कथोरे यांचे विरोधात बंड करत ,परिवर्तन पॅनेलची स्थापना करुन जिल्हाधिकारी यांची परवानगी घेतली आणि आमदार कथोरे यांचे विरोधक माजी केंद्रिय मंत्री कपिल पाटील व खासदार सुरेश (बाळ्या मामा) म्हात्रे, वनमंत्री गणेश नाईक यांचे संपर्कात जाऊन आपले पुनर्वसन करा अशी याचना केली. परंतु या पॅनेल मध्ये एकमत नसल्याने त्यांनी प्रवेश नाकारला, परंतु भाजपमध्ये फुट पडुन नये यासाठी भाजपच्या नेते मंडळींनी प्रयत्न केले नसल्याने अखेर राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नगराध्यक्षासह इतर नगरसेवकांना ९ सप्टेंबर रोजी पडघा येथे प्रवेश दिला जाईल असे जाहीर केले होते, मात्र तेथे परिवर्तन पॅनेलचे आठ नगरसेवक हजर झाले मात्र नगराध्यक्ष आणि शिंदे गटात असलेले इतर पाच नगरसेवक गैरहजर राहिल्याने परिवर्तन पॅनलने केलेला प्रवेश चर्चेचा विषय बनला असुन राजकीय घडामोडींना पुर्णविराम मिळाला असला तरी नगराध्यक्ष संतोष चौधरी कोणत्या गोटात आहेत हे गुलदस्त्यात आहे.

## वरिष्ठ नागरिक संघाच्या कॅरम लीगमध्ये दर्शन मोरे संघ विजयी

**मुंबई :**

वरिष्ठ नागरिक कॅरम क्लब शिवाजी पार्क यांच्यावतीने वरिष्ठ नागरिकांसाठी प्रथमच कॅरम प्रीमियर लीग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. शिवाजी पार्क येथील आजी आजोबा उद्यानातील हॉलमध्ये या स्पर्धा नुकत्याच संपन्न झाल्या. या स्पर्धेत एकंदर ८० खेळाडूंनी भाग घेतला त्यांचे १० संघात विभाजन करण्यात आले होते. अतिशय उत्साही वातावरणात या वरिष्ठ खेळाडूंनी स्पर्धेचा मनमुराद आनंद घेतला. अंतिम सामन्यात दर्शन मोरे संघाने रमेश ठाकूर संघास ४-२ असे हरवून लीगचे विजेतेपद पटकावले. आजी आजोबा संकल्पना राबविणारे व या उपक्रमास सुरुवातीपासून सहाय्य करणारे स्थानिक माजी आमदार सदा सरवणकर यांच्या हस्ते विजेत्या खेळाडूंना बक्षिसे देऊन गौरविण्यात आले. या प्रसंगी उपस्थित असलेले ज्येष्ठ आंतर राष्ट्रीय कॅरमपटू महेंद्र तांबे यांनी या स्तुत्य उपक्रमाचे कौतुक केले. तर सदा सरवणकर यांनी सुरु केलेल्या उपक्रमास चांगला प्रतिसाद मिळत असल्याने समाधान व्यक्त केले.

अंतिम विजयी दर्शन मोरे संघ वि वि रमेश ठाकूर संघ ( ४-२ ) विजय शेरला वि वि नारायण वेमुला २५-०

दिलीप नार्वेकर वि वि वासुदेव कट्टा २१-४

प्रीती जावकर वि वि ज्योत्स्ना गोखले २७-१४ सुनील पवार / डी. सावंत वि वि शैलेश म्हात्रे / शिवानंद भाये २५-४

दर्शन मोरे / शशांक प्रधान पराभूत विरुद्ध शैलेश म्हात्रे / रमेश पाटणकर ६-२५

प्रीती जावकर / वैगुडे पराभूत विरुद्ध ज्योत्स्ना गोखले / रमेश ठाकूर ५-२५.

## श्रीलंकेत तिसरा न्येलेनी ग्लोबल फोरम

### १०२ देशांतील ७०० प्रतिनिधींच्या उपस्थितीत संपन्न

**कँडी (श्रीलंका) :**

तिसरा न्येलेनी ग्लोबल फोरम ६ ते १३ सप्टेंबरदरम्यान श्रीलंकेतील कँडी शहरात उत्साहात पार पडला. यामध्ये १०२ देशांमधून सुमारे ७०० प्रतिनिधींनी सहभाग घेतला, यातील ६० टक्के महिला प्रतिनिधी होत्या. शेतकरी, मच्छीमार, महिला व युवक चळवळींना एकत्र आणणारा आणि अन्न सार्वभौमत्व, सामाजिक न्याय, पर्यायी विकास व्यवस्था यांसारख्या मुद्द्यांवर चर्चा करणारा हा महत्त्वपूर्ण फोरम ठरला. या फोरमचे आयोजन श्रीलंकेतील राष्ट्रीय सहकारी विकास संस्थाच्या कॅम्पसमध्ये करण्यात आले होते. 'ला व्हिया कॅम्पेसिना' या शेतकरी संघटनांच्या जागतिक चळवळीचा आणि 'कर्नाटक राज्य रयत संघम (KRRS)' चा त्यात महत्त्वपूर्ण सहभाग होता. भारतातील संयुक्त किसान मोर्चाच्या प्रतिनिधींनी देखील या फोरममध्ये सक्रीय सहभाग नोंदवला.

डॉ. अशोक ढवळे (अखिल भारतीय किसान सभा), राकेश टिकैत (बीकेयू), युद्धवीर सिंग (बीकेयू) आणि चुक्की नंजुंडस्वामी (KRRS) हे भारतातील चार प्रमुख शेतकरी नेते




या परिषदेसाठी आमंत्रित होते. त्यांनी विविध सत्रांमध्ये भांडवलशाही, साम्राज्यवाद, धार्मिक कट्टरता व पितृसत्ताकता यांविरुद्ध स्पष्ट भूमिका मांडली. डॉ. अशोक ढवळे यांनी मसुद्याबाबत भाष्य करताना दोन महत्त्वपूर्ण सुधारणा सुचवल्या:

१. सरंजामशाही आणि धर्मांधतेचा स्पष्ट उल्लेख दुष्ट प्रवृत्तींमध्ये करावा

२. "आमूलाग्र परिवर्तन" हे घोषवाक्य मान्य करताना समाजवाद हे अंतिम ध्येय म्हणून नमूद करावे. या फोरमचे घोषवाक्य होते "आमूलाग्र परिवर्तन: आज किंवा कधीच नाही!" ("Systemic Transformation is Now or Never!") या घोषवाक्याने २००४ साली मुंबईत पार पडलेल्या वर्ल्ड सोशल फोरमच्या "Another World is Possible" या घोषवाक्याची आठवण अनेकांनी जागवली. न्येलेनी ही माळी (पश्चिम आफ्रिका) येथील ऐतिहासिक, शूर आणि उद्यमशील शेतकरी महिला होती. तिच्या नावाने हा फोरम ओळखला जातो. यापूर्वीचे दोन फोरम्स माळीमध्ये अनुक्रमे २००७ व २०१५ मध्ये झाले होते. मूळतः हे तिसरे फोरम भारतात होणार होते, मात्र केंद्र सरकारने अडथळे आणल्याने ते श्रीलंकेत आयोजित करण्यात आले.

फोरमच्या उद्घाटन सत्रात श्रीलंकेच्या एनपीपी सरकारच्या वाणिज्य मंत्री वसंथ समरसिंघ आणि कृषी मंत्री समंथ विद्यारत्न यांनी उपस्थित प्रतिनिधींना शुभेच्छा दिल्या. चुक्की नंजुंडस्वामी, अनुका विमुक्ती डिसिल्वा, यांसारख्या नेत्यांनी आयोजन व समारोप सत्रांचे संचालन केले. फोरममध्ये युवाशक्ती, महिलांचे नेतृत्व, आणि पॅलेस्टाईनशी एकता यासारख्या मुद्द्यांवर सत्रे झाली. तसेच, २८ पानी राजकीय कृती कार्यक्रमाचा मसुदा चर्चेत ठेवण्यात आला. यामध्ये भांडवलशाही, वसाहतवाद, नवउदारवाद, जातीयता, लिंगभेद, फॅसिझम आदी अनिष्ट प्रवृत्तींवर थेट हल्ला करत जागतिक चळवळींसाठी कृती आराखडा मांडण्यात आला.

हे दैनिक मुद्रक व प्रकाशक संदीप चव्हाण यांनी बित्तंबातमी एसपी मीडिया प्रायव्हेट लिमिटेडसाठी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नं. डब्ल्यू-२३०, टी. टी. सी. इंडस्ट्रियल एरिया, खैरणे एम.आय.डी.सी., ठाणे बेलापूर रोड, नवी मुंबई-४००७१०, ठाणे जिल्हा, महाराष्ट्र येथे मुद्रित करून शॉप नं. ०७, साई बाबा को. ऑ. हौ. सोसायटी, कोपरी, ठाणे (पूर्व )-४००६०३, महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. ● संपादक : संदीप सदानंद चव्हाण, दुरध्वनी क्रमांक: ८१६९१५१४९७/८३६९२९६५९६ ● RNI.NO. MAHMAR ३९८३६/१९८२